


# दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**1,22,570** डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०३ ● अंक : ०२३ ● पुणे ● रविवार, दि. ०५ ऑक्टोबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



प्रसन्नदादा जगताप यांच्याकडून धनादेश सुपूर्द 3



दत्ताभाऊ कोल्हे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा ! 4

## ठळक बातम्या



### गौतमी पाटील "गेली कुठं गावना..."

पुणे (आरंभ पर्व) : पुणे गौतमी पाटील वाहन अपघात प्रकरणी गौतमी पाटील ला सिंहगड रोड पोलिसांनी नोटीस पाठवली आहे. गौतमी पाटीलच्या नावे असणाऱ्या वाहनाचा अपघात झाला असून, आपलं म्हणण मांडण्यासाठी तिने सिंहगड रोड पोलिस ठाण्यात यावं असं नोटीशीत म्हटलं गेलंय. विशेष म्हणजे ही नोटीस स्वतः गौतमी पाटीलने स्वीकारले असल्याची माहितीही समोर आली आहे. मात्र त्यानंतर गौतमी पाटीलशी पोलिसांचा संपर्क होऊ शकलेला नाही. त्यामुळे गौतमी पाटील नेमकी गेली कुठे? असा प्रश्न आता निर्माण होतोय. दरम्यान, यासंदर्भात डीसीपी संभाजी कदम यांनी माहिती देताना सांगितले की, "30 तारखेला पहाटे वडगाव ब्रिज खाली हा अपघात झालेला आहे. मरगळे नावाच्या व्यक्तीला दीनानाथ रुग्णालयात दाखल केलं होतं. तर आरोपी भोरवरून पुण्याकडे येत असताना ही दुर्घटना घडलेली आहे. या ठिकाणचे सीसीटीव्ही, लोकशन, साक्षीदार यांची चौकशी करून आरोपीची ओळखही पटलेली आहे. तसेच, आरोपीचे मेडिकल पोलिसांनी केलेले आहे, ब्लड सॅम्पल घेऊन गाडी देखील जप्त केलेली आहे."

### एक कोटीचा निधी; तरीही खड्डे हटेनात

वेल्हे (आरंभ पर्व) : वेल्हे चेलाडी रस्ता दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून गेल्या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये सुमारे एक कोटी रुपये निधी खर्च करण्यात आला आहे .मात्र सध्या या रस्त्यावरील खड्डे आणि होणारे अपघात पाहता हा रस्ता दुरुस्तीसाठी वापरण्यात आलेला सुमारे एक कोटी रुपयांचा निधी खड्ड्यात गेल्याचे चित्र दिसून येत आहे. रस्त्यात पडलेले खड्डे बुजवण्यासाठी, साईड पट्ट्या काढण्यासाठी व इतर दुरुस्तीसाठी राज्य शासनाच्या वतीने सार्वजनिक बांधकाम खात्याला दरवर्षी निधी देण्यात येतो. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने निविदा काढून रस्त्यांची देखभाल दुरुस्ती करण्यात येते. वेल्हे चेलाडी या रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीसाठीही गेल्या दोन वर्षात सुमारे एक कोटी रुपयांचा निधी वापरण्यात आल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे म्हणणे आहे. पण सध्या या रस्त्यावरील खड्डे आणि दुरावस्था पाहता हा एक कोटींचा निधी खड्ड्यात गेला की काय? असा प्रश्न निर्माण होत आहे.

### कोयत्याने हल्ला

पाबळ (आरंभ पर्व) : कान्हूर मेसाई (ता. शिरूर) येथील गारकोलवाडीत जुन्या वादातून युवकावर धारदार कोयत्याने हल्ला करण्यात आल्याची घटना घडली. याप्रकरणी शिक्रापूर पोलिस ठाण्यात एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अभिषेक हरिभाऊ शिंदे असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे.

# लोकप्रिय खासदार डॉ. अमोल कोल्हे यांना 'आरंभ रत्न' पुरस्कार जाहीर

## दै. आरंभ पर्वच्या वर्धापन दिनानिमित्त १३ ऑक्टोबर रोजी भव्य सन्मान सोहळा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय कार्यात सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करणारे सुप्रसिद्ध अभिनेते आणि खासदार डॉ. अमोल कोल्हे यांना 'दै. आरंभ पर्वचा "आरंभ रत्न" पुरस्कार २०२५' जाहीर करण्यात आला आहे. सोमवार, दि. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी होणाऱ्या दै. आरंभ पर्वच्या वर्धापन दिन सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

हा विशेष सोहळा श्री गणेश गार्डन लॉन्स अँड बँक्वेट, सिंहगड रोड, नांदेड फाटा, पुणे येथे सायंकाळी ५ ते ९ वाजेपर्यंत पार पडणार आहे.

या पारितोषिकाबद्दल खासदार डॉ. कोल्हे यांना अधिकृत निमंत्रण दै. आरंभ पर्वचे पत्रकार महेश वरवटे यांनी पुण्यातील निसर्ग ऑफिस येथे भेटून सुपूर्द केले. यावेळी डॉ. कोल्हे यांनी 'दै. आरंभ पर्व'च्या वर्धापन दिन सोहळ्याला शुभेच्छा देत कार्यक्रमाचे निमंत्रण स्विकारले.



दै. आरंभ पर्व या दैनिकाने अल्पावधीत सामाजिक विषयांवर निर्भीड वृत्तांकन आणि सकारात्मक उपक्रमांच्या माध्यमातून वाचकांपर्यंत विश्वासार्ह पत्रकारिता पोहोचवली आहे. या पार्श्वभूमीवर वर्धापन दिनाच्या औचित्याने समाजातील विविध क्षेत्रांतील कार्यकर्त्यांचा गौरव करण्याचा उपक्रम राबवण्यात येत आहे.

या कार्यक्रमास मान्यवर पाहुण्यांची उपस्थिती अपेक्षित असून, सांस्कृतिक कार्यक्रम, पुरस्कार वितरण आणि संवाद सत्र अशा विविध उपक्रमांनी सोहळा अधिक रंगतदार होणार आहे.

**● कार्यक्रमाची रूपरेषा ●**

● दिनांक : सोमवार, १३ ऑक्टोबर २०२५ ●

● स्थळ : श्री गणेश गार्डन लॉन्स अँड बँक्वेट, सिंहगड रोड, नांदेड फाटा, पुणे ●

● वेळ : सायं. ५ ते ९ ●



## संघटनात्मक बांधणी भक्कम केल्याशिवाय पर्याय नाही : उद्धव ठाकरे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

संघटनेची बांधणी भक्कम होत नाही, तोपर्यंत सभेला रिकाम्या खुर्च्या असूनही विरोधक जिंकले कसे ? आणि भरलेले मैदान असूनही आपण हरलो कसे ? याचे उत्तर तुम्हाला मिळणार नाही. प्रत्येक बूथ प्रमुखाने शिवसेनेचे काम घरोघरी पोहोचविले पाहीजे. बूथ प्रमुख व गटप्रमुख यांच्या यंत्रणेची बांधणी अधिक मजबूत करावी लागेल, असे केले तरच पुढील 25 वर्ष आपल्या सत्तेला कोणी धक्का लावू शकणार नाही,' असा विश्वास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी व्यक्त केला.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शहरातील शाखा प्रमुख व पदाधिकाऱ्यांचा अण्णा भाऊ साठे सभागृहात संवाद मेळावा घेण्यात आला. यावेळी शिवसेनेचे प्रवक्ते व खासदार संजय राऊत, पुणे जिल्हा संपर्क प्रमुख सचिन अहिर, पुणे जिल्हा सहसंपर्कप्रमुख आदित्य शिरोडकर, आमदार मिलिंद नार्वेकर, शिवसेना प्रवक्ते व जनसंपर्कप्रमुख हर्षल प्रधान, मुंबई महापालिकेच्या माजी महापौर स्नेहल आंबेकर, भारतीय कामगार सेनेचे सरचिटणीस डॉ.रघुनाथ कुचिक, राज्य संघटक वसंत मोरे, बाळासाहेब भांड, गोविंद घोळवे, शिवसेनेचे शहरप्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे, पुणे जिल्हाप्रमुख उल्हास शेवाळे आदी उपस्थित होते.

## आंदोलन करण्यावरून राष्ट्रवादीच्या दोन गटात बाचाबाची; शरद पवारांच्या आमदाराला धक्काबुक्की


**वडगाव शेरी (दै. आरंभ पर्व)**

लोहगाव मधील रखडलेल्या विकास कामासंदर्भात आंदोलन करण्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दोन गटांमध्ये वादावादी झाली. या वादावादीचे रूपांतर धक्काबुक्कीत आणि झटापटीत झाले. त्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार बापू पठारे यांना धक्काबुक्की करण्यात आली. दरम्यान उशिरापर्यंत विमानतळ पोलिसांनी याबाबत कोणताही गुन्हा दाखल केला नव्हता.

विमानतळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लोहगाव येथील गाथा लॉन्स येथे एका सेवापूर्ती समारंभ निमित्त वडगावशेरी चे आमदार बापू पठारे आणि लोहगाव येथील कार्यकर्ते बंडू खांदवे उपस्थित होते. लोहगाव येथील विविध रस्त्यांची कामे रखडल्याच्या मुद्द्यावरून पठारे आणि खांदवे यांच्यामध्ये या कार्यक्रमादरम्यान बाचाबाची आणि धक्काबुक्की झाली. ही बातमी पसरल्यानंतर दोन्ही गटाचे समर्थक कार्यक्रम स्थळी जमले. दोन्ही गटाच्या समर्थकांनी एकमेकांना शिवीगाळ केली. पोलिसांनी हस्तक्षेप करीत दोन्ही गटाच्या समर्थकांना दूर केले.

पोलिसांच्या विनंतीनुसार सदर ठिकाणावरून पठारे निघाल्यानंतर बंडू खांदवे यांनी पुन्हा त्यांची गाडी अडवून त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी त्यांना बाजूला केले. मध्यरात्रीपर्यंत याबाबत पठारे आणि खांदवे यांपैकी कोणीही तक्रार दिली नव्हती. त्यामुळे पोलिसांनी कोणताही गुन्हा मध्यरात्रीपर्यंत दाखल केला नाही. पोलीस निरीक्षक गोविंद जाधव म्हणाले, किरकोळ बाचाबाची झाली. खबरदारीचा उपाय म्हणून लोहगाव मध्ये पोलीस बंदोबस्त वाढवला आहे. दोन्ही गटांना शांत केले आहे. दोघांनी मारहाण झाल्याचा दावा केलेला असला तरी असा कोणताही प्रकार घडलेला नाही.



# वाहून गेलं शिवार सारं...



राज्यातली शेतशिवारं पाण्यानं वाहून नेली. पिकं गेलीच; पण माती, गुरंढोरं तेही त्यानं अक्षरशः ओरबाडलं. आता शहरांतून मदतीची गंगा बाहेर पडावी.

गणेशोत्सवात पाऊस पहिल्या दिवसापासून गणरायाच्या सोंडेत अडकला, तसा तो आदिशक्तीच्या उत्सवातही पहिल्या माळेपासूनच घटी बसला. जाता जाता त्यानं संपूर्ण राज्यच कवेत घेतलं. नव्हे, अक्षरश: थैमानच घातलं. पूरपाण्याची सवय नसलेल्या मराठवाड्यासह विदर्भ, पश्चिम भाग आणि उरल्यासुरल्या उत्तर महाराष्ट्रातही त्यानं हाहाकार उडवला.

आठवडाभरात पंधराएक माणसांसाठी तो काळ ठरला. दावणीला बांधलेली जनावरं सोडायलाही उसंत मिळाली नाही. दुभत्या गायी, बैल, कोंबड्यांसह हजारो जनावरं वाहून गेली. काही गोठ्यातच फुगून मेली. झाडं, घरादारांच्या हानीची गणतीच नाही. विहिरी, तळी-तलावसुद्धा एक तर गाळाने भरले किंवा ते फोडून तरी नेले!

राज्यातले ३१ जिल्हे अतिवृष्टीच्या तडाख्यात सापडले. अठरा कृषिप्रधान जिल्ह्यांतलं सुमारे ४०-४५ लाख हेक्टरवरील खरिपाचं पीक पावसानं वाहून नेलं. आजच्या घडीला अर्ध्याहून अधिक खरीप उद्ध्वस्त झालाच आहे. काही भागांत नद्या अद्यापही पात्राबाहेर आहेत. 'रेड ॲलर्ट'ही कायम असल्यानं आकडा वाढण्याचाच धोका. सोयाबीन, भुईमूग, कपाशी, तूर, मूग, कांदा, फळावळ असं जे काही पीक शेतात उरलंय, त्याचाही भरवसा उरलेला नाही. सडलेल्या, फुगलेल्या शेंगांतून कदाचित नवरात्रीतच अंकुर फुटतील. बळीराजाला ते जणू वाकुल्या दाखवतील. वेदनांची जखम वाहती करतील. 'खरिपाचं सोडा, पुढचा रब्बी तर चांगला होईला ना?' असं शेती, पीकपाण्याचं न कळणारा कोणीही म्हणू शकेल. परंतु, लाखो एकर शेतातली मातीसुद्धा खरवडून गेली असल्यानं पुढं मशागत तरी कशी करायची? नवी बांधबंदिस्ती करायची म्हणजे मोठा वेळ व पैसा लागणारच!

दुष्काळ ओला असो वा सुका, तो शेतकऱ्याला आयुष्यातून उठवतो. शेतीवर जगणाऱ्या चक्रालाही त्याचे चटके बसतातच. नैसर्गिक आपत्ती प्रत्येक वेळी नवं रूप दाखवत असते. आता तरी धडा घेणार काय, म्हणून सांगून जाते. परंतु, 'पालथ्या घड्यावर पाणी' असंच आपलं वागणं सुरू असतं. ऋतुचक्राला डिवचणं सुरूच असतं. झाडं, नद्या, नाल्यांचे गळे घोटण्याचं कारस्थान मग जिवावर बेततं. काही वेळा हानीचा मोबदला पैशांत मोजला जाऊ शकत नाही. परंतु, त्याशिवायही गत्यंतर नसतं. शासन स्तरावरून सरसकट मदतीची घोषणा झाली खरी; मात्र 'ओला दुष्काळ' नव्हे तर 'त्यासारखं' साह्य करण्याचं जाहीर झालं. ओलं संकट यापेक्षा वेगळं म्हणायचं काय? शेवटी घोषणा म्हणजे लबाडाघरचं आवतण. नियम-निकषांची जंत्रीही हळूच पुढे येईलच!



पावसानं शेती वा शेतातली माती नव्हे, शेतकऱ्याचं जगणंच ओरबाडलं. ज्याच्यावर सर्वाधिक भरवसा होता, त्या सख्यानंच पुन्हा एकवार त्याला नाडलं. पीक नव्हे, कास्तकऱ्याची स्वप्नंच कुजली. त्याला साल- दोन साल मागं नेऊन सोडलं. पूरपाण्यानं जे काही फोडून काढलं, ते उभं करायला बराच वेळ जाईल. संकटात कवी कुसुमाग्रजांच्या 'कणा' कवितेची आठवण होते. 'पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा' असं ते सांगून गेले; पण आता शेतातली गुंतवणूक भलीमोठी असल्याने केवळ 'लढ' म्हणण्याचे वा पोकळ बाता करण्याचे दिवस सरले.

शेतीवर गुजराण करणाऱ्यांना आधीच नागवलं गेलं असल्याने पाठीवर हात ठेवतानाच, दुसऱ्या हातानं मदतही द्यावीच लागेल. मग ती आर्थिक असेल वा अन्नवस्त्राची. मायबाप शासनकर्त्यांना निकषांचे अडसर सैल करावे लागतील. संकटाच्या माऱ्यानं पिचलेल्या मराठवाड्यातल्या शेतकऱ्याची येती दिवाळी शेतशिवारातली सडघाण निस्तरण्यातच खर्ची पडेल.

पुढे पुन्हा अवकाळी दबा धरून आहेच. त्यामुळे तुम्हा-आम्हालाही दातृत्वाची पणती तेवावी लागेल. 'फूल ना फुलाची पाकळी' प्रमाणं जुळवाजुळव करावी लागेल. आपल्या गावासाठी, गावकऱ्यांसाठी जमेल तसं रितं व्हावं लागेल. बांधिलकीचं भान दाखवत दातृत्वाचे पूर निघतील, तेव्हा संकटग्रस्तांच्या वेदनेवर खऱ्या अर्थाने फुंकर घातली जाईल. अन्यथा, अर्थव्यवस्थेचा कणा समजल्या जाणाऱ्या शेतीचं सारंच मुसळ केरात जायचं.

# संकल्प प्रतिष्ठान तर्फे ७५ हजार किलो साखरेचे वाटप

## अल्प दरात होणार साखरेचे व इतर वस्तूंचे वाटप

## निलेश गिरमे यांची माहिती

- **सालाबाद प्रमाणे यंदाही संकल्प प्रतिष्ठानचा समाजोपयोगी उपक्रम;**
- **उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आशीर्वाद**



**धायरी (पुणे) (दै. आरंभ पर्व)**

दिवाळीचा गोडवा प्रत्येकाच्या घराघरांत पोहोचावा, या सामाजिक भावनेतून शिवसेना युवासेना व संकल्प प्रतिष्ठान यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळी साखर वाटप उपक्रम मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला आहे.

यावर्षी 75000 किलो साखरेचे व इतर साहित्य अल्प दरात वाटप करण्यात येणार आहे. अशी माहिती आयोजक तथा शिवसेना युवा मोर्चाचे अध्यक्ष निलेश गिरमे यांनी दिली.

धायरी व परिसरातील नागरिकांची दिवाळी ही गोड व्हावी या उद्देशाने संकल्प प्रतिष्ठान दरवर्षी हा उपक्रम राबवत आहे. या उपक्रमांतर्गत नागरिकांना फक्त १०० रुपयांत ५ किलो साखर व इतर दिवाळी साहित्य दिले जाणार असून, यंदा एकूण ७५,००० किलो साखरेचे वाटप करण्यात येणार आहे.

समाजसेवा आणि लोकाभिमुख कार्य हेच आपले कर्तव्य मानून ते दरवर्षी हा उपक्रम राबवितात. नागरिकांनी रेशन कार्ड ओरिजिनल व झेरॉक्स प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.

या उपक्रमाला महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे यांचा आशीर्वाद लाभला आहे. पुढे गिरमे म्हणाले, "धायरीव परिसरातील कोणतेही कुटुंब दिवाळीत वंचित राहू नये. प्रत्येकाच्या घरी प्रकाश आणि गोडवा पोहोचावा, हीच खरी दिवाळी आहे."

उपक्रमाचे आयोजन माजी नगरसेविका सौ. राधिका ताई दशरथ गिरमे यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून, हा कार्यक्रम रविवार, दिनांक १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत, संकल्प प्रतिष्ठान कार्यालय, अभिरुची परिसर धायरी येथे पार पडणार आहे.

संकल्प प्रतिष्ठान व शिवसेना शाखा, धायरी यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणारा हा उपक्रम दरवर्षी अधिक मोठ्या प्रमाणात विस्तारत आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या समाजोपयोगी व संवेदनशील उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक निलेश गिरमे यांनी केले आहे.




# भूपेंद्र मोरे यांच्यातर्फे सोसायटी होम मिनिस्टर स्पर्धा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नवरात्र महोत्सवानिमित्त धायरी, वडगाव, नऱ्हे व आंबेगाव परिसरात "सोसायटी होम मिनिस्टर स्पर्धा २०२५" या उपक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांच्या पुढाकाराने करण्यात आले असून, महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. दिनांक ३० सप्टेंबर रोजी बालाजी मिटकॉन, मालाजी नगर व विराज पॅराडाईज सोसायटी परिसरात हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. निवेदक राज शिनारे यांच्या सूत्रसंचालनाखाली झालेल्या या स्पर्धेत महिलांनी विविध खेळ, प्रश्नोत्तरे व उपक्रमांमध्ये सहभागी होऊन आपले कौशल्य सादर केले.

याप्रसंगी बक्षीस वितरण सोहळ्याला शिवसेना जिल्हा युवासेना प्रमुख सोमनाथभाऊ कुटे, उद्योजक किरण सावंत, निखिल पारवडे आदी मान्यवर उपस्थित होते. महिला भगिनींशी संवाद साधत अशा उपक्रमातून महिलांना सामाजिक व सांस्कृतिक व्यासपीठ मिळते, भूपेंद्र मोरे यांचे काम आदर्शवत आहे असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

आयोजक भूपेंद्र मुरलीधर मोरे यांनी सांगितले की, "महिलांच्या कौशल्यांना व्यासपीठ मिळावे, त्यांच्या घरगुती कामाबरोबरच सामाजिक सहभाग वाढावा, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे. नागरिकांनी केलेली प्रशंसा व मिळालेला प्रतिसाद निश्चितच प्रेरणादायी आहे." या उपक्रमामुळे परिसरातील महिलांमध्ये एकात्मता आणि आत्मविश्वास वृद्धिंगत झाल्याचे यानिमित्त महिला भगिनींनी सांगितले.

सर्व सहभागी महिला व उपस्थित नागरिकांचे आभार मानत, भविष्यातही असेच उपक्रम राबवण्याचा संकल्प आयोजक भूपेंद्र मोरे यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमासाठी हरीश वैद्य, लतिफ शेख,प्रशिक दारुंडे, सुनील पढेर , यांनी परिश्रम घेतले.

# रुपेश घुले पाटील

## कामाच्या जोरावर जनतेतून मागणी म्हणूनच प्रभाग ३३ मधून प्रयत्न



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नांदेड, नांदेड सिटी परिसराच्या, जेपीनगर भागात विकासकामांमुळे गेली अनेक वर्ष जनता माझ्याकडे विश्वासाने पाहते. "मी महानगरपालिकेसाठी इच्छुक आहे, जनतेच्या कामावर आधारितच मला मिळालेला पाठिंबा हा माझा सर्वात मोठा आधार आहे," असे भाजप धायरी-शिवणे मंडलाध्यक्ष रुपेश तात्या घुले पाटील यांनी दैनिक आरंभपर्वच्या मिशन महानगरपालिका 2025 या सदरातील संवादात स्पष्ट केले.

आमदार भीमराव तापकीर यांच्या नेतृत्वाखाली नांदेड व नांदेड सिटी परिसरात कोट्यवधी रुपयांची विकासकामे केली आहेत. ड्रेनेज व्यवस्था, रस्त्यांचे काँक्रिटीकरण, स्वच्छ पाणीपुरवठा, शाळा व सामाजिक सुविधा या क्षेत्रांत त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे, मतदार नोंदणी शिबिरे, लाडकी बहीण योजनेचे फॉर्म भरणे, तसेच कोरोना काळात मदतीचे वितरण अशा अनेक उपक्रमांतून समाजाशी नाळ जोडली आहे.

"मी भारतीय जनता पार्टीचा आणि आमदार भीमराव अण्णा तापकीर यांचा कार्यकर्ता आहे. कार्यकर्ता म्हणून संघटन वाढवणे, जनतेपर्यंत पोहोचणे आणि माणसे जोडणे हेच माझे कर्तव्य आहे. पक्ष देईल ती जबाबदारी स्वीकारत काम करत राहीन," असे ते म्हणाले. लोकसभा, विधानसभा किंवा महानगरपालिका निवडणूक असो, प्रत्येक वेळी त्यांनी कार्यकर्त्याच्या भूमिकेतून भाजपच्या विजयासाठी अहोरात्र प्रयत्न केले आहेत. असेही रुपेश घुले पाटील यांनी स्पष्ट केले.

**राजकीय वारसा आणि प्रस्थ :** घुले पाटील कुटुंबाचा नांदेड गावाशी ऐतिहासिक संबंध आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात त्यांच्या घराण्याला पाटीलकीचा मान मिळाला होता. पणजोबा एकनाथ घुले पाटील हे मुलखी पाटील म्हणून कार्यरत होते,

**● शब्दांकन ●**
**लक्ष्मण साबळे, निवासी संपादक 8605284272**

दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा
मिशन महानगरपालिका २०२५

आजोबा मार्तंड घुले पाटील सरपंच व पोलीस पाटील होते, तर वडील आबासाहेब घुले पाटील यांनी सलग 15 वर्षे उपसरपंच म्हणून गावाचा कारभार पाहिला. या वारशातून रुपेश घुले पाटील यांनी राजकीय व सामाजिक क्षेत्रात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.

**पक्षीय जबाबदारी आणि जनसेवेची परंपरा :** भाजप प्रभागाध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी संघटन विस्तारावर भर दिला. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून यावर्षी त्यांची खडकवासला मतदारसंघातील भाजप धायरी-शिवणे मंडलाध्यक्षपदी निवड करण्यात आली. पक्षातील विश्वास आणि जनतेतील पाठिंबा या दोन्हीमुळे त्यांचे स्थान मजबूत झाले आहे. त्यांच्या पत्नी सौ. रश्मी घुले पाटील या भाजप महिला आघाडीच्या अध्यक्षा म्हणून कार्यरत आहेत आणि महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबवतात.

ही निवडणूक लढवावी व नगरसेवक व हे त्यांच्या वडिलांची इच्छा होती ती पूर्ण करण्यासाठी रुपेश घुले पाटील आगामी महानगरपालिका निवडणुकीमध्ये प्रबळ दावेदार म्हणून पुढे येत आहेत. "जनतेने माझ्यावर दाखवलेला विश्वास हीच माझी खरी ताकद आहे. पक्षाने दिलेल्या प्रत्येक संधीचा उपयोग जनतेच्या सेवेसाठी करत राहीन आणि शिवणे खडकवासला प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी माझा प्रयत्न अखंड सुरू राहील, पक्ष जो निर्णय घेईल तो आपणास मान्य आहे" असेही त्यांनी आरंभपर्वशी बोलताना सांगितले.

## नगरसेवक पदाकडे वाटचाल

**नांदेड व परिसरातील नागरिकांसाठी एकच कॉल प्रॉब्लेम सॉल्व या दृष्टी रुपेश घुले यांची कार्यपद्धती एक आदर्श ठरते. कायमस्वरूपी जनसेवेत सक्रिय असल्यामुळे त्यांची कायम आहे. गेल्या अनेक दशकांपासून नांदेड व परिसरातील जनतेचा त्यांच्यावर असलेला विश्वास, शांत व मनमिळाऊ स्वभाव, आणि विकासकामांची भक्कम पार्श्वभूमी यामुळे येणाऱ्या पुणे महानगरपालिका निवडणुकीत रुपेश घुले पाटील यांचे स्थान नगरसेवक म्हणून निश्चित असल्याचे मानले जाते.**

# मराठवाडा जनविकास संघाकडून पूरग्रस्तांना मदतीचा 'महायज्ञ'

## आता शालेय साहित्यासाठी आर्त आवाहन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मराठवाडा जनविकास संघ (महाराष्ट्र राज्य) आणि मराठवाडा मुक्तीसंग्राम समन्वय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाड्यातील पूरग्रस्त भागांमध्ये 'सेवा हीच ईश्वर पूजा' या भावनेतून अत्यावश्यक मदतीचे मोठे कार्य हाती घेण्यात आले आहे. संघाचे संस्थापक अध्यक्ष अरुण पवार यांच्या नेतृत्वाखाली ३० सप्टेंबर २०२५ रोजी धान्य किट आणि अत्यावश्यक साहित्याचे थेट गावा-गावांत जाऊन वाटप करण्यात आले.

या तातडीच्या मदत मोहिमेत १००० हून अधिक कुटुंबांना किट वाटप करण्यात आले. यामध्ये तांदूळ, तूरडाळ, बेसन, तेल, साखर, मीठ, मिरची पावडर यांसारख्या धान्यासोबतच ब्लँकेट, चटई, साडी, टॉवेल आणि प्रातिनिधिक स्वरूपात शालेय साहित्याचा समावेश होता.

या जिल्ह्यांमध्ये पोहोचली मदत:

बीड जिल्हा, शिरूर कासार तालुका: कोळवाडी, ब्रम्हनाथ बोरगाव, गात शिरापूर.

धाराशिव जिल्हा, भूम व परंडा तालुका: येथे तहसीलदार निलेश काकडे, नायब तहसीलदार पांडुरंग मांडेकर आणि प्रशासकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत किट वाटप करण्यात आले.

पूरग्रस्त भागात धान्य-वस्त्र मिळाल्याने जगण्याचा आधार मिळाला असला तरी, तेथील परिस्थिती पाहता आता शालेय साहित्याची तीव्र गरज जाणवत आहे. पूर ओसरल्यावर विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबायला नको, या विचारातून संघटनेने आता 'मन आणि बुद्धी पोसली पाहिजे' या उद्देशाने शालेय साहित्य संकलनाचा नवा संकल्प केला आहे. अरुण पवार यांनी देवस्थान, प्रार्थनास्थळे आणि मंदिर ट्रस्टला देखील 'जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा' हे सिद्ध करण्यासाठी या कार्यात सक्रिय होण्याची विनंती केली आहे.



५ ते ७ ऑक्टोबर या कालावधीत शेतकऱ्यांसाठी धान्य किट गरजू वस्तू आणि विद्यार्थ्यांसाठी वह्या पुस्तके कंपास दप्तर यासारख्या साहित्याचा पूर्ण संच घेऊन मदत टेम्पो पुन्हा रवाना होणार आहे. नागरिकांनी या 'यज्ञात फूल न फुलाची पाकळी' म्हणून आपल्या सोइच्छेने मदत अरुण कन्स्ट्रक्शन ऑफिस, तिळक मोटर्स समोर, पिंपळे गुरव, पिंपरी चिंचवड, पुणे या ठिकाणी त्वरित जमा करावी, असे कळकळीचे आवाहन करण्यात आले आहे.

# ६ पासून मंत्रालयासमोर अर्ध नग्न लक्षवेधी चित्र आंदोलन

- **शासन व सत्ताधारी राजकीय मंडळी राहतील आत्महत्येस जबाबदार : चित्रकार माने यांचा इशारा**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या आत्मनिर्भर भारत योजनेची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणे, व्यवसायासाठी आत्मनिर्भर भारत योजनेतून कर्ज मिळणे व शासकीय व राजकीय स्तरावर गेल्या ५ वर्षापासून माझी दखल का घेतली नाही. या सर्व मागण्यांसहित येत्या ६ ऑक्टोबर पासून मुंबई येथे मंत्रालयासमोर पंतप्रधान मोदी यांच्या चित्रासहित अर्थ नग्न लक्षवेधी चित्र आंदोलन करणार आहे. तसेच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही याची दखल घेतली नाही तर माझ्या आत्महत्यास शासन व राजकीय मंडळी जबाबदार राहतील. असा इशारा जगद्गुरू संत तुकाराम महाराज व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे तैल चित्र काढणारे देह येथील ज्येष्ठ चित्रकार प्रेम माने यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.

वरील विषयाला अनुसरून २०२४ ला पुणे जिल्हाधिकारी यांना ३५ पानांचे निवेदन दिले होते. परंतू आजपर्यंत त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. प्रधानमंत्री मोदी यांच्या सुंदर स्वप्नातील विकसीत आत्मनिर्भर भारत या संकल्पनेला बँक व सत्ताधारी पार्टीतील काही पदाधिकारी यांच्याकडून प्रचंड विरोध होत असून पंतप्रधानांच्या आदेशाला पायदळी तुडविले जात आहे.

वास्तव आर्ट या बंद पडलेल्या व एनपीए झालेल्या माझ्या व्यवसायासाठी आत्मनिर्भर भारत योजनेतून १ कोटी रुपये कर्ज मागणी केली होती. बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत झालेल्या मिटींग मध्ये मला १० लाख रुपये कर्ज देण्याचे मान्य केले. परंतू स्थानिक बँक मॅनेजरने कर्ज मंजूर केले नाही. त्याच प्रमाणे माझा स्वर्गवासी मुलगा जो १०० टक्के दिव्यांग होता. त्याच्या नावे पुणे जिल्हा परिषदेच्या माध्यमातून अपंग बिज भांडवल योजनेतून दिड लाख रुपयांची कर्ज मागणी केलेली बँकेनी नाकारली. याचे कारण अद्याप समझले नाही. २८ मे २०२४ रोजी पत्नी कामिनी माने हिने प्रधानमंत्री मुद्रा योजनेतून बँक ऑफ महाराष्ट्र देहूगाव शाखेतून २ लाख रुपये कर्ज मागणी केली होती परंतू बँकेने ते ही नाकारले. अशा प्रकारे वारंवार बँकेने माझे कर्ज का नाकारले हे अद्याप कळाले नाही.

चित्रकार प्रेम माने यांनी आरोप केला की, बँकेच्या कर्ज अडवणुकीमुळे माझ्या व्यवसायाचे प्रत्यक्ष १० कोटी रूपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. या आर्थिक नुकसानीमुळे उपचारा अभावी माझ्या दिव्यांग मुलाला गमवावे लागले. याची जबाबदारी कोण घेणार हा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

यामुळे माझी मागणी आहे की बँकेने आमचे अडवून ठेवलेले कर्ज तातडीने मंजूर करावे. तसेच राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी आमच्या कर्जासाठी बँकेला हमी पत्र दयावे व तातडीने कर्ज मिळवून देण्याची मागणी त्यांनी यावेळी केली आहे.

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
रविवार, दि. ०५ ऑक्टोबर २०२५









# विजयादशमीनिमित्त पारंपरिक जोर मारण्याची स्पर्धा उत्साहात

**धायरी(दै. आरंभ पर्व)**

विजयादशमीच्या पारंपरिक उत्सवाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून अखिल धायरी गाव तालीम संघ व क्रीडा मंडळ यांच्या वतीने दिगंबर अण्णा पोकळे व सहकाऱ्यांच्या आयोजनाखाली यंदाही जोर मारण्याची स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली.

या स्पर्धेत पश्चिम हवेली पंचक्रोशीतील धनकवडी, नऱ्हे, धामणवाडी, कोल्हेवाडी, नांदेड, घोरे, डोणजे, सांगरुन, कुडजे, कल्याण, रोडे, खानापूर, पानशेत, आगळंबे अशा अनेक गावांतील एकूण ११३ खेळाडूंनी सहभाग घेतला. स्पर्धा अत्यंत कडव्या आणि जोशपूर्ण झाल्या.



खुल्या गटामध्ये स्वयंभू धनंजय पोकळे यांनी यावर्षी एका दमात २१२५ जोर मारून विजेतेपद पटकावले. त्यांनी मागील वर्षीही २०२४ जोर मारत विजेतेपद मिळवले होते. तर १६ ते १८ वर्ष वयोगटात स्वराज वाल्हेकर यांनी ८०१ जोर मारून प्रथम क्रमांक, रुद्र कोरडे यांनी ७५० जोर मारून द्वितीय क्रमांक, तर यश कावरे यांनी ६५० जोर मारून तृतीय क्रमांक मिळवला.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी बाळासाहेब पोकळे, काकासाहेब चव्हाण, किशोर पोकळे, चंद्रशेखर पोकळे, राजाभाऊ लायगुडे, सचिन पोकळे, राहुल पोकळे, निलेश पोकळे,निलेश दमिष्टे, कुणाल पोकळे, संदीप चव्हाण, महादेव पोकळे, राहुल भोसले, चंद्रकांत पोकळे यांसह गावातील अनेक मान्यवरांनी मोलाची मदत केली.

सर्व स्पर्धकांना ग्रामस्थांच्या उपस्थितीत सन्मानपूर्वक बक्षिसे देण्यात आली. गेली ३२ वर्षे परंपरेने ही स्पर्धा दरवर्षी दसऱ्याला आयोजित केली जाते आणि आजही या स्पर्धेमुळे गावातील तरुणाईला व्यसनमुक्त, शिस्तबद्ध आणि खेळाडूवृत्ती जोपासण्याची प्रेरणा मिळत असल्याचे आयोजकांनी सांगितले.


**प्रत्येक गावामध्ये दिगंबर अण्णा पोकळे यांच्या सारखे अनेक अनुभवी व उत्तम खेळाडू असतात. त्या खेळाडूंनी सध्या त्यांचा अनुभव व त्यांची आवड नवीन तरुणांमध्ये जागी करण्याची गरज आहे. धायरीतील गावकऱ्यांची ही खूप जुनी पारंपारिक पद्धत आजूबाजूच्या सर्व गावांनी अवलंबून नवीन तरुणाई मोबाईल व इतर व्यसन आवड, चुकीच्या पद्धतीपेक्षा स्वतःच्या गावच्या, देशाच्या नावासाठी आवडीने व काळजीने लक्षपूर्वक चांगल्या मार्गाला कसे जातील या साठी धायरी गावकरी लोकां सारखेच प्रत्येक गावाने प्रयत्न केले पाहिजेत असे निलेश दमीष्टे यांनी सांगितले.**

## प्रसन्नदादा जगताप यांच्याकडून मुख्यमंत्री फडणवीस यांना धनादेश सुपूर्द

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील विविध भागांमध्ये आलेल्या महापुरामुळे शेकडो कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. अशा कठीण प्रसंगात भाजप नेते,पुण्याचे माजी उपमहापौर अ‍ॅड. प्रसन्नदादा जगताप हे नेहमीप्रमाणेच गोरगरिबांच्या मदतीसाठी पुढे सरसावले आहेत. त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री सन देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे पूरग्रस्तांसाठी आर्थिक मदत धनादेशाच्या स्वरूपात सुपूर्द केली.

अ‍ॅड. प्रसन्नदादा जगताप हे सामाजिक कार्याची जाण ठेवून सदैव सामान्य नागरिकांच्या पाठीशी उभे राहतात. गरीब, वंचित, तसेच आपत्तीग्रस्तांना मदतीचा हात देणे ही त्यांची कार्यपद्धती ठरली आहे. पूरग्रस्त कुटुंबांचे दुःख कमी करण्यासाठी त्यांनी केलेले हे योगदान कौतुकास्पद ठरत आहे.



यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली व समाजातील प्रत्येकाने पूरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी आपापल्या परीने सहकार्य करावे, असे आवाहन केले. ह्या कृतीतून पुन्हा एकदा स्पष्ट झाले की, माजी उपमहापौर अ‍ॅड. प्रसन्नदादा जगताप हे नेहमी गोरगरिबांच्या मदतीसाठी सज्ज असतात.

# सद्गुरूंच्या कृपेनेच साध्य होतो आत्मसाक्षात्कार

- **सद्गुरू श्री शिवकृपानंद स्वामीजींच्या मंगलवाणीचा हजारो साधकांनी घेतला लाभ**
- **ध्यानस्थली नागपूर येथे महानवरात्री अनुष्ठानाचा भव्य समारोप**

**नागपूर (दै. आरंभ पर्व)**

"आपण ज्या उपासनेला धर्म मानतो, ती केवळ पद्धत असून त्यातून अंतःकरणातील परिवर्तन घडत नाही. खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवते ती आत्मानुभूती. या आत्मानुभूतीचे संस्कार समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचावेत, यासाठीच हिमालयातील सद्गुरूंनी मला या आत्मज्ञानाचा प्रसार करण्याची आज्ञा दिली," असे प्रेरणादायी विचार हिमालयीन सद्गुरू श्री शिवकृपानंद स्वामीजी यांनी साधकांना उद्देशून आपल्या मंगलवाणीमधून व्यक्त केले. ध्यानस्थली नागपूर, मध्यभारत समर्पण आश्रम, ठाणा (पादरी), बुटीबोरी–उमरेड रोड येथे २२ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर दरम्यान नवरात्री अनुष्ठानाचे आयोजन करण्यात आले होते. या अनुष्ठानाच्या निमित्ताने येथे बांधलेल्या भव्य 'श्री गुरुशक्तीधाम' मध्ये 'श्री मंगलमूर्ती'ची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्यानंतर २ ऑक्टोबर रोजी दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर या पवित्र स्थळाचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला. हजारो साधकांच्या उपस्थितीत सद्गुरू श्री शिवकृपानंद स्वामीजींच्या दिव्य सत्संगाने या सोहळ्याला आध्यात्मिक उंची प्राप्त झाली. लोकार्पण सोहळ्याची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. या वेळी प्रमुख पाहुण्यांमध्ये अतिरिक्त पोलिस महासंचालक श्री अजेय रानडे, पोलिस महानिरीक्षक श्री संदीप पाटील, राणा शिपिंग कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्री राणा सुर्यवंशी, रुबी हॉल पुणेचे अध्यक्ष डॉ. परवेझ ग्रांट, योग प्रभा भारती सेवा संस्था ट्रस्टच्या व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीमती शीना ओमप्रकाश, लॉइड एनर्जी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री प्रभाकरण, कार्यकारी संचालक श्री व्यंकटेशन, गंगाधर इन्फोटेकचे व्यवस्थापकीय संचालक श्री आशीष फडणवीस, बेल लॅब कॅलिफोर्निया विद्यापीठाचे श्री नरसिंहा रेड्डी, आयसीएआरचे उपसंचालक डॉ. सुरेश चौधरी आणि गुजरातचे निवृत्त पोलिस महासंचालक श्री एस. एस. खांडवाला आदी मान्यवर उपस्थित होते.



## पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात : पुणेकरांनी दाखवली संवेदनशीलता

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये, विशेषत: मराठवाडा, विदर्भ आणि सोलापूरमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे आणि महापुरामुळे जनजीवन विस्कळीत झाले असताना, आम आदमी पार्टी (आप), पुणे यांच्या वतीने आज, ३ ऑक्टोबर रोजी पूरग्रस्तांच्या मदतीसाठी पूरग्रस्त सहाय्यता निधी व वस्तू गोळा करण्याची मोहीम यशस्वीरित्या राबवण्यात आली. डेक्कन जिमखाना येथील कलाकार कट्टा, कॅफे गुडलक जवळ या ठिकाणी सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत पुणेकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पूरग्रस्तांचे मोठे नुकसान

गेल्या काही दिवसांतील पावसाने शेती आणि पिकांचे अपरिमित नुकसान केले आहे. शेते पाण्याखाली आहेत, जनावरे वाहून गेली आहेत आणि रब्बी पिकासाठीही जमीन वापरण्यायोग्य राहिलेली नाही. अशा कठीण परिस्थितीत सरकारी मदत अपुरी असल्याने, गरजू भावा-बहिणींना तातडीने आधार देणे महत्त्वाचे आहे.




या मदत मोहिमेत पुणेकरांनी रेशन किट (रु. १५००/-), नवीन कपडे, गृहपयोगी वस्तू, वह्या व शालेय साहित्य आणि आर्थिक निधी देऊन आपला सहभाग नोंदवला.

या संकलित निधी आणि वस्तू सामाजिक संघटना व कार्यकर्त्यांच्या मार्फत पूरग्रस्त भागातील गरजू लोकांपर्यंत पोहचवण्यात येणार आहेत. आर्थिक मदत नोंदणीकृत संस्थांमार्फत पोहोचवली जाईल.

पूरग्रस्तांच्या मदतीसाठी आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी पुणेकरांनी दाखवलेल्या संवेदनशीलतेबद्दल आम आदमी पार्टी, पुणे यांनी आभार व्यक्त केले आहेत.







## थोडक्यात पण महत्वाचे



### दुर्गामातेच्या मंदिरात भव्य आणि दिव्य कार्यक्रमाचे आयोजन

**आंबेगाव खुर्द (आरंभ पर्व) : दुर्गामाता प्रतिष्ठानच्या वतीने यावर्षी विजयादशमीच्या निमित्ताने दुर्गामातेच्या मंदिरात भव्य आणि दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सकाळपासूनच मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. देवीची मिरवणूक ढोल-ताशांच्या गजरात, टाळ-मृदंगाच्या निनादात आणि जयकारांच्या घोषात मोठ्या दिमाखात काढण्यात आली. गावभर नटलेल्या रांगोळ्या, फुलांच्या तोरणांनी सजलेले रस्ते आणि भगव्या पताका या सगळ्यामुळे परिसरात धार्मिक व सांस्कृतिक वातावरण निर्माण झाले.दोन तास चाललेल्या गोंधळी वादनाने उपस्थितांची मने जिंकली. कलाकारांच्या दमदार वादनाने वातावरण दुमदुमून गेले व भक्तांनीही या क्षणांचा मनमुराद आनंद घेतला. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व मार्गदर्शन संस्थापक अध्यक्ष नरेंद्र पारखे यांनी केले. त्यांच्या उत्साहवर्धक नेतृत्वामुळेच कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. उपस्थित नागरिक, मान्यवर व प्रतिष्ठित व्यक्तींनी पारखे यांच्या कार्याचे विशेष कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या. या सोहळ्यात मोठ्या प्रमाणावर महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग होता.**




### धायरी ग्रामस्थांनी ४०० पूरग्रस्त कुटुंबांना दिला मदतीचा हात

**धायरी (आरंभ पर्व) : दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर धायरी ग्रामस्थांनी सामाजिक बांधिलकी जोपासत पूरग्रस्तांसाठी अन्नधान्य वाटपाचा उपक्रम राबवला. बंधुत्व ग्रुप आणि ग्रामस्थांच्या पुढाकाराने दोन टेम्पोभर अन्नधान्याचे किट तयार करून सुमारे 300 ते 400 पूरग्रस्त कुटुंबांना मदत पोहोचवण्यात आली. अचानक आलेल्या पुरामुळे अनेक कुटुंबांचे मोठे नुकसान झाले आहे. अशा वेळी दसऱ्याच्या मंगलदिनी गावकऱ्यांनी पुढाकार घेत गरजूंपर्यंत मदतीचा हात पोहोचवून खरी बंधुत्वाची जाणीव दाखवून दिली. यावेळी मिलिंद भाऊ पोकळे, अ‍ॅड. राजेश मिंडे, शिवाजीराव मते, नेताजी बाबर, महेश पोकळे, संतोष चाकणकर, राजेश पोकळे, दादासाहेब पोकळे पाटील, प्रशांत दादा पोकळे, ऋषिकेश पोकळे यांच्यासह धायरीतील अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. या उपक्रमातून गावातील एकोपा, परस्पर सहकार्याची भावना आणि सामाजिक बांधिलकी अधोरेखित झाली. दसरा साजरा करण्याचा हा खऱ्या अर्थाने आदर्शवत उपक्रम ठरला.**

# भूपेंद्र मोरेंनी वाचून दाखवला समस्यांचा पाढा

## रूपाली चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली नागरी समस्यांवर आढावा बैठक संपन्न



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा मा. रूपालीताई चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांच्या दालनात खडकवासला विधानसभा मतदारसंघातील नागरी समस्यांबाबत महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेण्यात आली.

या बैठकीत नऱ्हेतील सामाजिक कार्यकर्ते , राष्ट्रवादी काँग्रेसचे खडकवासला कार्याध्यक्ष भूपेंद्र मोरे यांनी धायरी, वडगाव, नऱ्हे, आंबेगाव परिसरातील विविध नागरी समस्यांचा पाढा अधिकाऱ्यांसमोर मांडला.

पुणे महानगरपालिकेची जाऊनही रस्त्यांची दुरवस्था, कचरा व्यवस्थापनातील त्रुटी, पाणीपुरवठा,ड्रेनेज व डीपी रस्ते अशा महत्त्वाच्या मुद्द्यांवर फोटो पुरावे दाखवत संबंधित अधिकाऱ्यांना धारेवर धरले.

कामात दिरंगाईपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांनी चुका विसरून जनतेला गृहीत धरावे व काम करावे, नागरिकांच्या प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे.अशी अपेक्षा श्री मोरे यांनी व्यक्त केली .



यावर प्रतिक्रिया देताना मा. रूपालीताई चाकणकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाहीचे आदेश दिले. तसेच आयुक्त नवल किशोर राम यांनी पुढील आठवड्यात पाहणी दौरे घेऊन शक्य ती कामे तातडीने सुरू करण्याचे आश्वासन दिले.

या बैठकीस मा. प्रदेश प्रवक्ते राहुल पोकळे, विधानसभा अध्यक्ष बाबा धुमाळ, अधिकारी अनिरुद्ध पावसकर यांच्यासह अविनाश लगड, सागर कोल्हे, कुणाल पोकळे, सौरभ मते, भाग्यश्री कामठे आणि विविध पक्षांचे नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**"आंदोलनाचे इशारे दिल्यानंतर प्रशासन कार्यवाही करते. पण किती दिवस आम्ही आवाज उठवण्याची वाट पाहणार पुणे महानगरपालिका प्रशासनाने स्वतःहून नागरिकांना भौतिक सुविधा दिल्याच पाहिजे. जनतेच्या प्रश्नांसाठी मी नेहमी एक पाऊल पुढे असेन, प्रशासनाने योग्य ते सहकार्य करावे.. नागरिकांना या समस्या पासून सुटका मिळावी हीच अपेक्षा.**

**- श्री. भूपेंद्र मोरे**
**सामाजिक कार्यकर्ते**

या आढावा बैठकीमुळे नऱ्हे धायरी वडगाव आंबेगाव परिसरातील नागरिकांच्या तातडीच्या समस्या सोडविण्यास गती मिळणार असून, भूपेंद्र मोरे यांच्या पुढाकाराने प्रशासन याकडे गंभीरतेने पाहत असल्याचे चित्र समोर आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### नागरिकांचा सन्मान, वृद्धाश्रमास किराणा साहित्य भेट


● मा. स्वीकृत नगरसेवक गंगाधर भडावळे यांचा आदर्श उपक्रम

धायरी (आरंभ पर्व) : ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त माजी स्वीकृत नगरसेवक गंगाधर भडावळे यांनी धायरी येथील आधार ज्येष्ठ सहनिवास वृद्धाश्रमास भेट देऊन तेथील ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत त्यांची विचारपूस केली. सामाजिक जबाबदारीचे भान ठेवत त्यांनी किराणा मालाचे साहित्य आश्रमास भेट दिले. या प्रसंगी साठ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. निरोगी आयुष्य आणि आनंदी जीवनासाठी शुभेच्छा देत भडावळे यांनी ज्येष्ठांचा सन्मान करण्याचा आदर्श उपक्रम राबविला. भडावळे यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत असून, ज्येष्ठ नागरिकांमध्ये त्यांची असलेली लोकप्रियता व आत्मीयता यानिमित्ताने अधोरेखित झाली. यावेळी संजीवनी योगा ग्रुप मधील ज्येष्ठ नागरिक कल्याणराव येवले, विश्राम अभंग, रवींद्र बडवे, सूर्यकांत चौधरी, श्रीराम पंडित, संजय देशपांडे, सुरेश गुरव, सुधीर वांद्रेकर, अशोक कुलकर्णी, सुरेश तेलकर, सुभाष वाल्हेकर, नंदकुमार यादव, सुरेश वायदंडे, मनोहर धुमाळ, नरेंद्र रामगुडे, नारायण हुद्दार, नंदकुमार कुलकर्णी, आण्णासाहेब पाटील, प्रमोद घळसासी, डी. के. गिड्डे, शांतनु रायकर, जे. बी. कुलकर्णी व अशोक चौधरी उपस्थित होते. या उपक्रमातून ज्येष्ठ नागरिक दिनाचे महत्व अधोरेखित झाले असून, समाजातील ज्येष्ठांचा सन्मान व काळजी घेणे ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याचा संदेश देण्यात आला.

### दुर्गामाता नवरात्र महोत्सवाचे कौतुक; महाप्रसादाचे नियोजन शिस्तबद्ध




वडगाव शेरी (आरंभ पर्व) : दुर्गामाता नवरात्र महोत्सवानिमित्त आयोजित महाप्रसाद कार्यक्रमाचे नियोजन वडगाव शेरीतील प्रेम नगर, स्टेला मॅरिस स्कूल येथील तील सर्व कार्यकर्त्यांनी अत्यंत सुयोग्य व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडले. भाविकांची मोठी गर्दी असूनही प्रसादाचे वाटप कोणतीही गडबड न होता शांततेत व सद्भावी वातावरणात पूर्ण झाले. महोत्सव समिती व कार्यकर्त्यांनी प्रसादाचे नियोजन करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. प्रत्येक भाविकाला प्रसाद मिळावा, त्यात कुठलाही त्रास होऊ नये, याची काटेकोरपणे काळजी घेण्यात आली. स्थानिक नागरिक तसेच उपस्थित भाविकांनी या उत्तम व्यवस्थेचे कौतुक केले. या निमित्ताने दुर्गामाता नवरात्र महोत्सवाने केवळ भक्ती व श्रद्धेचा उत्सवच नव्हे, तर सामूहिक कार्यसंस्कृती व सामाजिक एकोपा याचेही दर्शन घडवले. कार्यकर्त्यांच्या या नियोजनबद्ध कामगिरीमुळे सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.







# “प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध” – गंगाधर भडावळे




**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धायरी व वडगाव परिसरात भारतीय जनता पक्षाचे कार्य वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे भाजप नेते गंगाधरजी भडावळे यांनी आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी इच्छुक असल्याचे जाहीर केले आहे. मात्र उमेदवारीच्या बाबतीत पक्ष जो निर्णय घेईल तो शिरोधार्य मान्य करूनच पुढील वाटचाल करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. “प्रभाग कोणताही असो, मला संधी मिळावी हीच इच्छा आहे. पक्षाचा आदेश सर्वोपरि असून त्यानुसारच काम करणार आहे,” असे भडावळे यांनी दैनिक आरंभपर्व शी संवाद साधताना सांगितले.

दैनिक आरंभपर्वने आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दृष्टीन **“व्हिजन पीएमसी”** हे सदर सुरू केले आहे. यामध्ये भाजप नेते माजी स्वीकृत नगरसेवक श्री .गंगाधर भडावळे यांनी संवाद साधला..

**निवडणुकीच्या दृष्टीने आपली भूमिका स्पष्ट केली :** भडावळे यांनी खडकवासला विधानसभा मतदारसंघात माजी महापौर आमदार मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी मिळाल्यापासून सातत्याने पक्षासाठी खारीचा वाटा उचलला आहे. स्थानिक पातळीवर भाजपचे जाळे मजबूत करण्यासाठी केलेल्या परिश्रमांमुळे ते कार्यकर्त्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये लोकप्रिय झाले आहेत.

धायरी परिसरात स्वीकृत नगरसेवक म्हणून काम करताना त्यांनी विविध विकासकामांना प्राधान्य दिले. रस्ते सुधारणा, पाणीपुरवठा, क्रीडांगणे उभारणी, सार्वजनिक सुविधा, समाजकेंद्रे आदी कामे करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. नागरिकांच्या मूलभूत गरजांची जाण ठेवून काम करणारा नेता म्हणून त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली आहे.

संजीवनी योगा ग्रुप, ज्येष्ठ नागरिक संघ, विविध सामाजिक संस्था व पक्ष संघटनांच्या उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. “जनतेच्या विश्वासाच्या बळावर धायरीचा सर्वांगीण विकास करणे हेच माझे ध्येय आहे. यापूर्वी काही महत्त्वाची कामे पूर्ण केली असून, उर्वरित विकास प्रकल्पांवर काम करण्याचा संकल्प मी केला आहे. नागरिकांना सोयीसुविधा मिळाव्यात, त्यांच्या अपेक्षा पूर्ण व्हाव्यात यासाठी माझी धडपड कायम आहे,” असे त्यांनी स्पष्ट केले.

आमदार भीमराव तापकीर यांच्याशी असलेले घट्ट स्नेहसंबंध आणि कार्यकर्त्यांशी असलेले आत्मीय नाते ही त्यांची खास जमेची बाजू असल्याचेही भडावळे यांनी नमूद केले. “पक्षाच्या मार्गदर्शनाखालीच माझे सर्व कार्य आहे. जनतेच्या आशिर्वादाने प्रभागाच्या विकासासाठी अधिक मोठ्या प्रमाणावर काम करण्याची संधी मिळेल, अशी अपेक्षा आहे,” असेही त्यांनी सांगितले.

धायरी-वडगाव परिसरात सध्या त्यांच्या इच्छुकतेची चर्चा सुरू असून, पक्षाकडून त्यांना उमेदवारी मिळते का याकडे नागरिक व कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

## शेतकऱ्यांना तात्काळ मदत व सरसकट कर्जमाफी द्यावी – तानाजी कांबळे

**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**

सोलापूर जिल्हा तसेच मराठवाडा व राज्यातील अनेक भागात अवकाळी पाऊस, नद्यांना आलेला पूर यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. अनेकांचे पिके वाहून गेली, घरे उद्ध्वस्त झाली, जनावरे दगावली असून शेतकऱ्यांच्या हातात काहीच उरलेले नाही. अशा बिकट परिस्थितीत सरकारने तातडीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी जाहीर करून प्रत्येकी किमान पन्नास हजार रुपयांची मदत त्वरित द्यावी,



अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तानाजी कांबळे यांनी केली आहे.

कांबळे म्हणाले की, “सोलापूर जिल्ह्यात दोन-तीन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यांच्या कुटुंबियांना २५ लाख रुपयांची मदत, सर्व कर्जाची माफी तसेच वारसांना शासकीय नोकरी मिळाली पाहिजे. अन्यथा त्यांची संसार उभे राहू शकत नाहीत.”

यावेळी त्यांनी शासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत सांगितले की, “कोट्यवधी रुपये विकासकामांवर खर्च होत असतात, काही दिवस ही कामे थांबवली तरी नुकसान नाही. पण शेतकऱ्यांना तातडीने घर, निवारा, रोजीरोटी, मुलांचा शैक्षणिक खर्च व जगण्यासाठी रोख मदत देणे आवश्यक आहे.”

शेतकरी तीन-तीन दिवस उपाशी राहत आहेत, तुटपुंज्या मदतीने काही होणार नाही, दिवाळी तोंडावर आली आहे तरी त्यांच्या संसाराचे काय, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

कांबळे यांनी पुढे मागणी केली की, मुख्यमंत्र्यांनी तात्काळ जिल्हाधिकाऱ्यांना व तहसीलदारांना आदेश देऊन रोख स्वरूपात व पुरेशा प्रमाणात मदत वितरित करावी आणि सरसकट कर्जमाफी करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.

## करकंब येथील नंदाबाई शिंदे यांचे निधन

**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**

करकंब (ता. पंढरपूर, जि. सोलापूर) – करकंब येथील ज्येष्ठ नागरिक श्रीमती नंदाबाई संदीपान शिंदे (वय ८५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. नंदाबाई शिंदे या आपल्या साध्या, शांत स्वभावामुळे सर्वांना प्रिय होत्या.



त्यांच्या जाण्याने शिंदे कुटुंबियांसह करकंब गावातील अनेक नातेसंबंध आणि समाजमनावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगी, एक मुलगा, सून, जावई व नातवंडे असा परिवार आहे. संपूर्ण गाव त्यांच्या आठवणीने भावूक झाला असून सर्वत्र श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

## वैभवशाली दुर्गापूजा महोत्सवास उत्साहात प्रारंभ



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बंगाली परंपरेचा, भक्तीचा आणि सांस्कृतिक वैभवाचा संगम घडविणारा सप्तपदी कल्चरल अँड स्पोर्ट्स असोसिएशन तर्फे आयोजित शारदीय दुर्गा पूजा २०२५ महोत्सवास अत्यंत उत्साहात प्रारंभ झाला. पुण्यातील साफा बौटस, बालेवाडी हायस्ट्रीट येथे सुरु झालेला हा भव्य महोत्सव २ ऑक्टोबर २०२५ पर्यंत चालणार असून, या काळात बंगाली संस्कृतीचा अप्रतिम अनुभव भक्तांना मिळणार आहे.

या वर्षीच्या दुर्गापूजा महोत्सवाची संकल्पना “बारसा आणि सामंजस्याची सांगड (Heritage Meets Harmony)” अशी असून, इको-फ्रेंडली दुर्गा मातेची भव्य मूर्ती हे या उत्सवाचे मुख्य आकर्षण ठरले आहे. फुलांची आकर्षक सजावट, कर्णमधुर रबिंद्र संगीत, आणि पारंपरिक बंगाली वातावरणात सजवलेले पंडाल यामुळे परिसर भक्तिमय झाला आहे.

## महात्मा गांधी व लालबहाद्दूर शास्त्री जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम

### पै. राहुल मते यांनी केले आयोजन

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला गावातील महात्मा गांधी चौकात आज दिनांक २ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती व माजी पंतप्रधान लालबहाद्दूर शास्त्री जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने या दोन महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

हा अभिवादन सोहळा पैलवान राहुल मुरलीधर मते यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला गावातील नागरिक, कार्यकर्ते, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी मा. जिल्हा परिषद सदस्य विलास अण्णा मते पाटील, सो. अनिताताई इंगळे, मनसे खडकवासला विभागप्रमुख विजय मते, मनसे खडकवासला विधानसभा सरचिटणीस अतुल मते, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सरचिटणीस आनंद मते, बारामती लोकसभा मतदारसंघ उपाध्यक्ष सुरेश मते, खडकवासला गाव तंटामुक्ती समितीचे माजी अध्यक्ष शांताराम मते, हवेली तालुका माजी अध्यक्ष संदीप मते, मनसे नेते शिवाजी मते, ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्ते साहेबराव मते, दिलीप मते, पीएमपीएमएल पास विभाग प्रमुख विकास मते, सकाळ उद्योग समूहाचे तुळशीदास मते, शंकरराव वांजळे, आप नेते ह. भ. प. रमेश मते आदी मान्यवरांनी उपस्थिती लावली.

तसेच श्रीमती आशाबाई मते, श्रीमती शारदा मते, कालिदास मते, गोपाळ मते, चंद्रकांत मते, सुदाम गोरे यांच्यासह गावातील विविध संस्था, संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच बहुसंख्येने महिला भगिनी सहभागी झाल्या.



कार्यक्रमात मान्यवरांनी आपले विचार व्यक्त करताना महात्मा गांधी आणि लालबहाद्दूर शास्त्री यांच्या जीवनातील साधेपणा, अहिंसा, सत्याग्रह, आत्मनिर्भरता व स्वच्छतेचा संदेश आजच्या पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज असल्याचे सांगितले. त्यांच्या विचारांचे मोल आजच्या समाजात अधिक अधोरेखित करण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन करण्यात आले.

या अभिवादन सोहळ्यामुळे खडकवासला ग्रामस्थांना गांधीजींच्या विचारांची व शास्त्रीजींच्या कर्तृत्वाची पुनः स्मृती झाली.

गावकऱ्यांनी या निमित्ताने समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.







# दत्ताभाऊ कोल्हे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा !

### हजारो नागरिकांच्या उपस्थितीत भव्य अभिष्टचिंतन सोहळा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रदेश भाजपाचे सचिव दत्ताभाऊ कोल्हे यांचा वाढदिवस अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. नांदेड येथील श्री गणेश गार्डन येथे आयोजित या अभिष्टचिंतन सोहळ्यासाठी परिसरातील नागरिक, कार्यकर्ते तसेच सर्वपक्षीय मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सोहळ्याचे औचित्य साधून प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण, आमदार भीमराव अण्णा तपकीर, आमदार सिद्धार्थ शिरोळे, शहराध्यक्ष धीरज घाटे, प्रदेश ओबीसी मोर्चा




सचिव संजय गाते यांनी दत्ताभाऊंना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. मान्यवरांनी दत्ताभाऊंनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात केलेल्या कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाची प्रस्तावना दत्ताभाऊ कोल्हे यांनी स्वतः केली. “नागरिकांचा आशीर्वाद आणि भगिनींचा विश्वास हेच माझे बळ आहे,” असे त्यांनी सांगितले. आभार प्रदर्शन खडकवासला भाजपा सरचिटणीस धनश्रीताई कोल्हे यांनी मानले. यावेळी मंडलाध्यक्ष रुपेश घुले, सचिन मोरे,सचिन दांगट, सुभाष नाणेकर, निखिल धावडे, बापूसाहेब पोकळे, किशोर पोकळे, लक्ष्मण मते, संदीप पोकळे, अतुल चाकणकर, अनिल मते, रमेश गायकवाड, मनीषा मोरे, रश्मी घुले,महेश हगवणे , गणेश वांजळे,यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. विशेष म्हणजे या कार्यक्रमासाठी अजय कोल्हे, अंकित कोल्हे ,दर्शन रायकर, तसेच दत्ताभाऊ कोल्हे मित्रपरिवार यांनी परिश्रम घेतले. त्यांच्या अथक मेहनतीमुळे हा सोहळा यशस्वी ठरला. सोहळ्यात सेल्फी विथ बप्पा, होम मिनिस्टर खेळ, पैठणीचा लकी ड्रॉ आणि दांडिया स्पर्धा अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. महिला भगिनींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत उत्सवाला रंगत आणली.

हजारो नागरिकांच्या उपस्थितीत पार पडलेला हा वाढदिवस सोहळा परिसरात चर्चेचा विषय ठरला. पुणे महानगरपालिकेसाठी दत्ताभाऊ कोल्हे हे प्रबळ दावेदार असल्यामुळे या कार्यक्रमाला विशेष राजकीय महत्व प्राप्त झाले.

“भगिनींचा आशीर्वाद आणि नागरिकांचा विश्वास असाच कायम लाभो,” अशी भावना व्यक्त करत दत्ताभाऊंनी सर्वांचे मनापासून आभार मानले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com
• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



### कै. बंडोजी खंडोजी चव्हाण विद्यालयात महाभोंडला उत्सव

धायरी (आरंभ पर्व) : धारेश्वर विद्या व क्रीडा प्रतिष्ठान धायरी संचलित कै. बंडोजी खंडोजी चव्हाण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पारंपरिक महाभोंडला उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात हादग्याच्या पूजनाने करण्यात आली. पारंपरिक भोंडल्याच्या गाण्यांमधून देवीचे आवाहन करण्यात आले. तसेच विद्यार्थिनींनी रंगीबेरंगी परिधान करून दांडियाचा आनंद घेतला. या प्रसंगी गुरुवर्य व संस्था सल्लागार आदरणीय विद्यासागर सर, माननीय श्री. शिंदे सर, प्राचार्य विलास खाडे सर, विभाग प्रमुख मदन सूर्यवंशी सर, सौ. पल्लवी पवार, सौ. सुजाता घाग, सौ. चित्रा पाटील, सौ. जया थोरात, सौ. शारदा टेकाळे, सौ. पद्मजा बोरा, सौ. शलाका पुंडे, सौ. श्वेता माळी तसेच महिला शिक्षक बहुसंख्येने उपस्थित होत्या. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय काकासाहेब चव्हाण यांनी या कार्यक्रमास शुभेच्छा देऊन विद्यार्थिनींना अशा सांस्कृतिक कार्यक्रमातून परंपरा व मूल्यांची जपणूक करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभागाच्या वतीने करण्यात आले होते. शाळेतील विद्यार्थिनींचा उत्साह, पारंपरिक गाणी, दांडिया आणि अध्यापकांचा सक्रिय सहभाग यामुळे हा महाभोंडला उत्सव संस्मरणीय ठरला.

### नेहा भूपेंद्र मोरे यांना विश्वकर्मा विद्यापीठाचा विशेष सन्मान



पुणे (आरंभ पर्व) : विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने नवउद्योजिका व नवउद्योजकांना घडविण्याच्या कार्याबद्दल सौ. नेहा भूपेंद्र मोरे यांना विशेष सन्मान प्रदान करण्यात आला. हा सन्मान चितळे बंधू उद्योग समूहाचे सर्वेसर्वा श्री. इंद्रनील चितळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी नेहा मोरे यांच्या कार्याचे मनःपूर्वक कौतुक केले. सन्मानानंतर भावना व्यक्त करताना सौ. नेहा भूपेंद्र मोरे म्हणाल्या, "हा सन्मान माझ्या वैयक्तिक कामगिरीचा नसून आपल्या समाजातील नवउद्योजिका व नवउद्योजकांच्या प्रयत्नांचा सन्मान आहे. विश्वकर्मा विद्यापीठासह सर्व मान्यवरांनी माझ्या कार्याची दखल घेतल्याने मला अधिक जबाबदारीची जाणीव झाली आहे. पुढेही महिला सक्षमीकरण, उद्योजकता विकास आणि सामाजिक कार्य या क्षेत्रांत नवनवीन उपक्रम राबविण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन." यावेळी सारसबाग येथील महालक्ष्मी मंदिरात सौ. मोरे यांना महालक्ष्मी आरतीचा विशेष मान लाभला, ज्यामुळे या कार्यक्रमाला विशेष महत्व प्राप्त झाले.




### यशवंत विद्यालयात विविध कार्यक्रम

खडकवासला (आरंभ पर्व) : रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक व शिक्षणमहर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३८व्या जयंतीनिमित्त तसेच कै. बाबुरावशेठ मते पुण्यस्मरण दिनानिमित्त यशवंत विद्यालयात २७ सप्टेंबर रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या गणित-विज्ञान साहित्य, रांगोळी, हस्तकला व चित्रकला प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सौ. अनुजा सुशांत पाटील यांनी भूषविले. प्रमुख वक्ते श्री. बी. एस. जाधव तर रयत शिक्षण संस्थेचे पश्चिम विभागीय अधिकारी श्री. संजय मोहिते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार फडतरे यांनी प्रास्ताविक करताना उपक्रमांचा आलेख मांडला व देणगीदारांचे आभार मानले. प्रमुख वक्ते जाधव सरांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कार्य विद्यार्थ्यांसमोर उलगडले. तर श्री. मोहिते यांनी विद्यालयातील उपक्रमांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान अध्यक्षा व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी स्कूल कमिटी सदस्य विलास मते, अशोक मते, विजय मते, पै.राहुल मते, संजय मते, सौरभ मते, दिवाकर मते, सुनील मते, दत्ताभाऊ कोल्हे, अनिल मते, सुरेश मते, तुळशीदास मते, उमेश गोन्हे, आनंद मते, सागर कोल्हे, सोपान मते, मंजूताई मते, बाळासाहेब गोगावले आदी मान्यवर उपस्थित होते.

# भाजप नेते गंगाधर भडावळे यांच्याकडून पूरग्रस्तांना दिलासा

## आठवडाभर पुरेल अशी जीवनावश्यक मदत; आमदारांचे कौतुक






**पुणे (दै. आरंभ पर्व)**

धायरी व परिसरातून जनतेचे प्रतिनिधित्व करणारे भाजप नेते व माजी स्वीकृत नगरसेवक गंगाधर भडावळे यांनी अलीकडील अतिवृष्टी व पुरामुळे गंभीर अडचणीत सापडलेल्या माढा तालुक्यातील नागरिकांसाठी मदतीचा हात पुढे केला. त्यांनी स्वखर्चातून दीडशे अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तूंचे किट पाठवले.

या किटमध्ये अशा वस्तूंचा समावेश होता की ज्या एका कुटुंबाला किमान आठवडाभर पुरतील. त्यामुळे संकटग्रस्त कुटुंबांना तात्पुरता दिलासा मिळाला असून त्यांच्या जगण्याला नवी ऊर्जा मिळाली आहे.

हवेलीचे तहसिलदार किरण सुरवसे यांनी गंगाधर भडावळे यांच्या मदतीचे कौतुक केले.

या कार्याचे माढा तालुक्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी कौतुक केले. त्यांनी सांगितले की, "गंगाधर भडावळे यांचे हे कार्य समाजाशी असलेल्या खरी बांधिलकीचे उदाहरण आहे. माढा तालुक्यातील जनता त्यांची कायमची ऋणी राहील आणि आमचा आशीर्वाद त्यांना सदैव लाभेल."

तसेच खडकवासला मतदारसंघाचे आमदार भीमराव अण्णा तापकीर यांनीही भडावळे व संजीवनी योगा ग्रुपच्या कार्यकर्त्यांचे विशेष कौतुक केले. "सामाजिक जाण ठेवून संकटात सापडलेल्या कुटुंबांच्या पाठीशी उभे राहणे हे स्तुत्य आहे. गंगाधर भडावळे आणि त्यांचा संजीवनी योगा ग्रुप खरं तर समाजासाठी प्रेरणादायी कार्य करत आहेत," अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

भडावळे यांनी सांगितले की, "सामाजिक कार्य करायचे असेल तर ते समाजाच्या खऱ्या गरजेत उतरले पाहिजे. पुढील काळातही आणखी मदत पाठवण्याचा माझा संकल्प आहे."

### संजीवनी योगा ग्रुपचा मोलाचा सहभाग

**या मदतकार्य उपक्रमात संजीवनी योगा ग्रुपच्या सदस्यांनी महत्त्वपूर्ण परिश्रम घेतले. यात दादासाहेब झेंडे पाटील, गिड्डे काका, कल्याणराव येवले, सुरेश गुरव, सुधीर वांद्रेकर, सुरेश तेलकर, जितेंद्र आवटी, महेश जगताप, नंदकुमार यादव, जे. बी. कुलकर्णी, मनोहर धुमाळ, नारायण हुद्दार, सुभाष वाल्हेकर, पंडित काका, संजय देशपांडे, नरेंद्र रामगुडे, उमेश राज्योपाध्ये, शांतनु रायकर आणि श्रीकृष्ण कुलकर्णी यांचा समावेश होता.**

## उमा राय यांची भाजपा खडकवासला मंडळ शिक्षण सेल संयोजकपदी नियुक्ती




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय जनता पार्टी खडकवासला विधानसभा मतदारसंघ मंडलाच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीत संस्कार फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा व माय मेडपॅथ आणि सूर्यनाथा पॅरामेडिकल नर्सिंग इन्स्टिट्यूटच्या सीईओ उमा राय यांची शिक्षण सेल संयोजकपदी नियुक्ती करण्यात आली.

ही महत्वपूर्ण जबाबदारी पुणे महानगर अध्यक्ष श्री. धीरजजी घाटे, खडकवासला मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार भीमराव अण्णा तापकीर तसेच दक्षिण मंडल अध्यक्ष रुपेशतात्या घुले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सोपविण्यात आली. नियुक्तीनंतर उमा राय यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, "मिळालेल्या संधीचे सोन करून निश्चितच मेहनत घेणार असून मोदीजींच्या विकसित भारत अभियानात सक्रिय योगदान देणार. विशेषतः शिक्षण क्षेत्रात वंचित व गरीब विद्यार्थ्यांना सहकार्य करणे हेच माझे ध्येय आहे."

वरिष्ठ नेते व पदाधिकाऱ्यांनी विश्वास व्यक्त केला आहे की, उमा राय यांच्या सामाजिक व शैक्षणिक अनुभवाचा लाभ भाजपा संघटनाला निश्चितच होईल.

या नियुक्तीमुळे खडकवासला मतदारसंघातील भाजपाच्या शिक्षण क्षेत्रातील उपक्रमांना नवे बळ मिळणार आहे.

## भारतात लवकर निवृत्तीचे नियोजन : ३५ वर्षांपूर्वी सुरुवात केल्याने भविष्य अधिक मजबूत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

तरूण व्यावसायिकांसाठी निवृत्ती हा एक दूरचा विषय वाटू शकतो, परंतु नियोजनात विलंब केल्याने मोठी किंमत मोजावी लागते. गृहकर्ज, लग्न आणि कुटुंब नियोजन अशा तात्काळ गोष्टींना प्राधान्य दिले गेले तरी निवृत्तीसाठी बचत पुढे ढकलल्याने अनेकदा आयुष्यात नंतर आर्थिक असुरक्षितता निर्माण होते. पारंपारिकपणे, भारतात निवृत्तीला नियोक्ता पेन्शन, संयुक्त कुटुंब प्रणाली आणि मध्यम ध्येयांनी पाठिंबा दिला आहे. आज, आधार संरचना विकसित झाली आहे. वाढत्या आयुर्मानासह, वाढत्या आरोग्यसेवा खर्च आणि महागाईसह, दीर्घकालीन बचतीला धक्का बसत आहे. विभक्त कुटुंबांनी आंतरपिढीतील कुटुंबांची जागा घेतली आहे आणि कमी व्यवसाय हमी पेन्शन प्रदान करत आहेत, त्यामुळे व्यक्ती आता स्वतःच्या निवृत्ती सुरक्षित करण्यासाठी प्रामुख्याने जबाबदार आहेत. पेन्शन फंड रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट अथॉरिटी (पीएफआरडीए) च्या वार्षिक अहवाल २०२३-२४ नुसार, राष्ट्रीय पेन्शन सिस्टम (एनपीएस) आणि अटल पेन्शन योजना (एपीवाय) सारख्या पेन्शन योजनांमध्ये सहभाग वाढतच आहे.

## 'सिंहगड रोड सांस्कृतिक, सामाजिक व क्रीडा परिषद' या नावावर शिक्कामोर्तब



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रोड परिसरातील थिटे बंगल्यात योगा हॉलमध्ये झालेल्या बैठकीत श्री .थिटे यांच्या अध्यक्षतेखाली विविध विषयांवर चर्चा होऊन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

बैठकीत संस्थेचे नाव 'सिंहगड रोड सांस्कृतिक, सामाजिक व क्रीडा परिषद' असे निश्चित करण्यात आले. कार्यकारिणी समिती पुढील बैठकीत जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. तसेच महिला सदस्यांनी सणासुदीमुळे अनेक सदस्य उपस्थित राहू शकत नसल्याने पुढील बैठक दसऱ्यानंतर आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. पुढील बैठकीची तारीख गटामध्ये जाहीर केली जाणार आहे.

संस्थेचे लोगो व लेटरहेड लवकरच अंतिम केले जाणार असून कार्यकारिणी निश्चित झाल्यानंतर कार्यालयाचा पत्ताही ठरवला जाणार आहे. शंभर टक्के सभासद नोंदणीसाठी सर्व उपस्थित सदस्यांनी पुढाकार घ्यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

दरम्यान, काही सदस्य बैठकीस उशिरा हजर झाल्याची नोंद करण्यात आली. बैठकीत श्री. प्रभुणे यांना ८ ऑक्टोबर रोजी कॅनडा प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. बैठकीचा समारोप डॉ. रितेश वांगवड यांनी आभारप्रदर्शन करून केला. चहापानाने बैठकीची सांगता झाली.






## "सोसायटी होम मिनिस्टर" वडगावमध्ये महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### भूपेंद्र मोरे यांच्या संकल्पनेतून "सोसायटी होम मिनिस्टर" कार्यक्रमास सुरुवात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नवरात्र उत्सवाचे औचित्य साधून शिवराज्य समूहाचे संस्थापक अध्यक्ष मा. भूपेंद्र मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रभाग क्र. ३४ मधील वडगाव बुद्रुक चरवड वस्ती येथे "सन्मान नवदुर्गांचा – खेळ पैठणीचा" अर्थात महिलांचा आवडता सोसायटी होम मिनिस्टर कार्यक्रम उत्साहात पार पडला.

"सोसायटी तुमची – कार्यक्रम आमचा" या टॅगलाईनखाली श्री.भूपेंद्र मोरे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत आपल्या कला, आत्मविश्वास व हुशारीचे उत्तम दर्शन घडवून कार्यक्रमाला रंगत आणली.

> **"महिला भगिनींसाठी आजवर काम केले आहे, पुढेही त्यांच्या कल्याणासाठी आणि आनंदासाठी अशा उपक्रमांचे आयोजन सातत्याने करत राहू."**
> **- भूपेंद्र मोरे, आयोजक**

सुप्रसिद्ध निवेदक श्री. राज शिनारे यांनी आकर्षक सूत्रसंचालन केले. विजेत्यांना मानाची पैठणीसह आकर्षक बक्षिसे प्रदान करण्यात आली.

प्रथम क्रमांक : पूजा कोल्हे (मानाची पैठणी)

द्वितीय क्रमांक : कविता मॅडम,

तृतीय क्रमांक : ललिता चोरगे,

उत्तेजनार्थ : मीरा खंडागळे, सोनाली पाटोळे, मोनिका फाळके, रेखा जागडे, ज्योती खंडागळे यांना पारितोषिके देण्यात आली.

या कार्यक्रमासाठी स्वप्नपूर्ती महिला फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ नेहा मोरे, सोनाली नायर,सुवर्णा नाईक, प्रतीक्षा माने, सुजाता नाईक, युगंधरा कामठे, पूजा कांबळे, रेणुका इंगळे तसेच जय अंबिका नवरात्र मंडळचे पदाधिकारी व कार्यकर्त्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या उपक्रमामुळे महिलांना त्यांच्या दैनंदिन व्यस्त जीवनातून आनंद मिळाला. नवरात्रीच्या पवित्र वातावरणात महिलांच्या सन्मानासाठी राबविण्यात आलेला हा उपक्रम सामाजिक ऐक्य व सांस्कृतिक जिव्हाळ्याचा दुवा ठरला.

### शेतकऱ्यांची व्यथा

**पोटाला चिमटा घेत
पेरलं सारं रान
जिवापाड जपता
उभारल हिरव सोनं**

**ढग कसे उनाड झाले
आभाळ सारं फाटुन गेलं
हाता तोंडाशी आलेल पीक
पुरान सार वाहून नेलं**

**उध्वस्त झालेलं पाहून
स्वप्न डोळ्यापुढ अंधारली
पाऊस काही थांबता थांबेना
जनावरं माणसं अर्धमेली झाली**

**सरकार मायबाप धावलं
नुकसान पाहणी करायला
शेताचा म्हसणओटा झाला
उरलं काय दाखवायला**

**अस कसं दळभद्री सरकार
मागणीचा म्हणे नेम चुकला
हेक्टरी भरपाई मागणारा
शेतकरी आज गुन्हेगार ठरला**

**विठ्ठल वळसे पाटील - पुणे
८४८४०६६०४२**

## नवरात्रोत्सव हा समाजाला प्रेरणा देणारा उपक्रम - अखिलेश मिश्रा

- **अखिल मित्र मंडळ नवरात्र उत्सवाला प्रचंड प्रतिसाद :**
- **२००६ पासून मंडळाने जोपासली आध्यात्मिक परंपरा**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नवरात्र हा भारतीय संस्कृतीतील अत्यंत पवित्र आणि उत्साहपूर्ण सण आहे. शक्तीची उपासना, धर्मपरंपरेचे पालन आणि भक्तीभावाची एकात्मता या सणातून प्रकट होते. नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची आराधना केली जाते. उपवास, जागरण, आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून या काळात समाज एकत्र येतो. त्यामुळे नवरात्र हा केवळ धार्मिक सण न राहता, तो अध्यात्मिक ऊर्जा देणारा आणि समाजाला प्रेरणा देणारा महोत्सव ठरत असल्याचे प्रतिपादन अखिल मित्र मंडळ नवरात्रोत्सवाचे संस्थापक अखिलेश मिश्रा यांनी केले.

पुणे शहरातील बी.टी.कवडे रोड येथील अखिल मित्र मंडळाच्या नवरात्रोत्सवात देवीची आरती आणि विविध उपक्रमांच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे औचित्य साधून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माजी नगरसेवक बाबू वागस्कर आणि भारतीय जनता पार्टीच्या (आठवले गट) माजी नगरसेविका हिमालीताई कांबळे यांच्या शुभहस्ते देवीची आरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थित भाविकांसाठी बिहार विरूद्ध उत्तरप्रदेश कृष्णलीला जुगलबंदी या आध्यात्मिक जुगलबंदीचे सादरीकरण करण्यात आले. हे पाहून उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. शिवाय, मंडळाच्या सामाजिक व सांस्कृतिक प्रगल्भतेचे तोंडभरून कौतुक केले. सन २००६ पासून मंडळाने सामाजिक बांधिलकी व आध्यात्मिक परंपरा जोपासून आपली वाटचाल यशस्वीपणे पूर्ण केली आहे.

नवरात्रोत्सव हा केवळ उपक्रम नसून, समाजाला एकत्र आणणारा पूल आहे. विविध जाती, धर्म, पंथ आणि सर्व वयोगटातील लोक एकत्र नाचताना सामाजिक सलोखा आणि ऐक्याची भावना वृद्धिंगत होते. ग्रामीण भागापासून ते शहरी महानगरांपर्यंत सर्वच स्तरातील लोक या परंपरेत सहभागी होतात. शिवाय, नवरात्राच्या कार्यक्रमांमध्ये सामाजिक उपक्रम, , जनजागृती मोहीम किंवा सामाजिक समस्यांवर भाष्यही केले जाते. यामुळे नवरात्रोत्सव हा सामाजिक जागृतीचे परिपूर्ण व सक्षम व्यासपीठ ठरते, असे मत भारतीय जनता पार्टीच्या माजी नगरसेविका हिमालीताई कांबळे यांनी व्यक्त केले.

नवरात्रोत्सवात समाजातील एकोपा, परंपरा आणि सामूहिक आनंदाचा अनोखा संगम दिसतो. देवीच्या आराधनेसोबतच गरबा-दांडिया सारखे नृत्यप्रकार, भजने आणि कीर्तन यांमुळे गावागावांतून उत्साहाची लाट उसळते. स्त्रीशक्ती, धैर्य आणि न्यायाच्या विचारांना प्रोत्साहन देणारा हा उत्सव लोकांना अंधश्रद्धेपेक्षा मूल्यांचा आणि सद्गुणांचा विचार करण्यास भाग पाडतो. नवरात्रोत्सव हा उत्साह, श्रद्धा आणि सामाजिक ऐक्य यांचा सुंदर संगम असल्याचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माजी नगरसेवक बाबू वागस्कर यांनी सांगितले.

## शाश्वतता आणि वाढीला चालना देण्यासाठी मोटोटेक २०२५ चे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय ऑटोमोटिव्ह उद्योग विद्युतीकरण, प्रगत उत्पादन, इंडस्ट्री ५.० एकत्रीकरण आणि शाश्वतता यांनी परिभाषित केलेल्या परिवर्तनकारी युगाच्या उंबरठ्यावर आहे. या पार्श्वभूमीवर, प्रतिष्ठित ऑटोमोटिव्ह एक्स्पो आणि कॉन्फरन्सची चौथी आवृत्ती, मोटोटेक २०२५, ९ आणि १० ऑक्टोबर २०२५ रोजी शेरेटन ग्रँड, पुणे येथे आयोजित केली जाईल. पीआरआयएलद्वारे आयोजित, हा कार्यक्रम जागतिक नेते, नवोन्मेषक आणि धोरणकर्ते एकत्र आणून ऑटोमोटिव्ह उत्पादनासाठी जागतिक केंद्र बनण्याच्या दिशेने भारताच्या प्रवासाला गती देण्यासाठी एक धोरणात्मक व्यासपीठ म्हणून काम करेल. ९ ऑक्टोबर ला उत्पादन उत्कृष्टता आणि तंत्रज्ञान बदल सादरीकरण करण्यात येणार आहेत या सत्रांमध्ये अशोक लेलँडचे उपाध्यक्ष सचिन गोयल यांच्या "ऑटोमोटिव्ह उत्पादनातील गुणवत्ता" या विषयावरील भाषणाने. दिवसभर टिकाऊ उत्पादन, डिजिटल विकास, ऑटोमेशन यांवर सखोल सत्रे होणार आहेत. १० ऑक्टोबर ला ईव्ही नेतृत्व, महिला सहभाग आणि भविष्यकालीन कौशल्ये दुसऱ्या दिवशी ईव्ही क्षेत्रातील नेतृत्व व कौशल्य विकासावर भर असेल.

ओमेगा सिकी मोबिलिटीचे उदय नारंग ईव्ही नेतृत्वाचे उद्घाटन भाषण करतील, तर कमिन्सच्या जेन नझरेथ बसू मुख्य अतिथी म्हणून भाषण करतील. या परिषदेला युनिव्हर्सल रोबोट्स, एटीआय , त्रायम टूलरूम, यश डायनॅमिक्स, श्नायडर इंटरनॅशनल, वागो, एआयसीई , जेंडामार्क, डाल्मेक, श्री रॅपिड टेक्नॉलॉजीज, पीएमआय , लाइट मेकॅनिक्स, मार्पोस, डब्ल्यू आयएमए आणि ओइ एम अपडेट मॅगझिन यांसारख्या प्रमुख उद्योग भागीदारांचा पाठिंबा आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### विश्वास आणि क्वालिटीचा माईलस्टोन '७ ट्री ऑर्गेनिक बुटीक नर्सरी'



पुणे (आरंभ पर्व) : फुले आणि विविध प्रकारची रोपटे तयार करण्यात आणि त्यांच्या संवर्धनात एक मैलाचा दगड स्थापित करणारी '७ ट्री ऑरगॅनिक बुटीक नर्सरी' चिखलगांव, कोळपण, पौड रोड, साधना व्हिलेज जवळ, पुणे येथे असुन आज या क्षेत्रातील एक विश्वासार्ह नाव बनली आहे. या नर्सरीच्या सखोल अभ्यासपूर्ण, किफायतशीर आणि विश्वासार्ह सल्ला तसेच तत्पर सेवेमुळे आज ही नर्सरी विविध प्रकारच्या कृषी उद्योगांमध्ये काम करणाऱ्या ग्राहकांची पहिली पसंती बनली आहे. या संदर्भात बोलताना कंपनीचे संस्थापक चेतना दुर्वे म्हणाल्या की, २०२१ मध्ये स्थापन झालेली ही रोपवाटिका सुरुवातीला फक्त बागकाम, लँडस्केप डिझाइन, लँडस्केप डेकोर या विषयांमध्ये मार्गदर्शन करणारी संस्था म्हणून काम करत होती. पुण्यात आणि कॅम्पसमध्ये चालणाऱ्या बागांच्या मालकांना रोपवाटिका मार्गदर्शनाचा खूप फायदा झाला. परंतु नंतर पूर्णपणे विकसित रोपवाटिका बनल्यानंतर, ७ ट्री गुलाबांसह विविध फुले आणि वनस्पतींचा प्रमुख पुरवठादार म्हणून उदयास आली.

### पॅरागॉनच्या टीव्ही जाहिरातीत आपलेपणा व परंपरांना उजाळा

Paragon

पुणे (आरंभ पर्व) : भारतातील सर्वात विश्वासार्ह फुटवेअर ब्रँड असलेल्या पॅरागॉनने यंदाच्या दिवाळीत एक नवीन कॅम्पेन सादर केले असून कौटुंबिक बंधाचा उत्सवी आनंद, एकत्रित हास्यविनोद आणि सणांना खास बनवणाऱ्या छोट्या छोट्या कमतरतांचा उत्सवी आनंद त्यामध्ये टिपण्यात आला आहे. दिवाळी म्हणजे केवळ दिवे आणि मिठाई नसते. त्यावेळी घर मित्र, परिवार आणि हास्यविनोदाने भरलेले असते. या उत्सवाच्या काळात पॅरागॉनची टीव्ही जाहिरात उत्सवाचे हेच सार प्रतिबिंबित करते. घराबाहेर असलेल्या पादत्राणांच्या संख्येवरून त्या घरातील आनंद प्रतिबिंबित होतो याची ती आठवण करून देते. या जाहिरातीची संकल्पना व चित्रीकरण पॅरागॉनची क्रिएटिव्ह एजन्सी पार्टनर, टर्मरिक इंटिग्रेटेड मार्केटिंग सोल्यूशन यांचे आहे. त्यात दोन मुख्य साध्या वास्तवांना आधार बनविण्यात आले आहे की दरवाज्यात असलेल्या पादत्राणांच्या संख्येवरून त्या घरात किती आत्मीय लोक जमले आहेत हे दिसून येते आणि प्रत्येक व्यक्ती त्या क्षणाचा आनंद वाढविण्यासाठी स्वतःचे विशिष्ठ योगदान कसे देते.

### जेबीटी मरेलच्या भारतातील जागतिक उत्पादन केंद्राचे उद्घाटन

पुणे (आरंभ पर्व) : अन्न प्रक्रिया तंत्रज्ञानातील जागतिक पातळीवरील अग्रणी कंपनी असलेल्या जेबीटी मरेलने आज भारतातील त्यांच्या जागतिक उत्पादन केंद्राचे (जीपीसी) उद्घाटन केले. जागतिक दर्जाच्या उत्पादनांद्वारे भारतीय आणि आशिया-पॅसिफिक बाजारपेठांना सेवा पुरविण्याच्या कंपनीच्या वचनबद्धतेतील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. जेबीटी मरेल इंडिया प्रा. लि, विवान कोहली इंडस्ट्रियल इस्टेट, जुना मुंबई पुणे हायवे, नायगाव, तालुका - मावळ, वडगाव, पुणे येथे नवीन सुविधेचे उद्घाटन ब्रायन डेक, सीईओ जेबीटी मरेल, ऑगस्टो रिझोलो क्षेत्र आणि एकत्रीकरण विभागाचे अध्यक्ष, बॉब पेट्री उपाध्यक्ष आणि अध्यक्ष मेट आणि प्रीपर्ड फूड्स आणि जॅक मार्टिन उपाध्यक्ष आणि मुख्य सप्लाय चैन ऑफिसर यांच्या हस्ते करणात आले त्यावेळी मॅन्युएल कॉफमन, वरिष्ठ संचालक, डीएफ अँड एच एपीएसी, पेर फ्रिबर्ग, वरिष्ठ संचालक, प्रीपर्ड फूड्स; आणि विक्रम मुलमुले, उपाध्यक्ष, दक्षिण आशिया, शिवेंद्र सिंग, ऑपरेशन्स मॅनेजर, दक्षिण आशिया उपखंड, जेबीटी मरेल यांच्यासह अन्य मान्यवरवरही उपथित होते.

### चिपळूण तालुक्यातील दुर्गम वाड्यांत स्ट्रीट लाईट्सचा प्रकाश; १ कोटी मंजूर



चिपळूण (आरंभ पर्व) : चिपळुण तालुक्यातील डोंगराळ,दुर्गम वस्तीमध्ये राहणाऱ्या धनगर,भोई,गवळी समाजासाठी एक दिलासादायक बातमी.आमदार शेखर निकम यांच्या प्रयत्नांना यश मिळत,वसंतराव नाईक तांडावस्ती सुधार योजनेंतर्गत रू. १ कोटींचा निधी सौर ऊर्जा स्ट्रीट लाईटसाठी मंजूर करण्यात आला आहे. मौजे कोंडमळा धनगरवाडी,कोसबी धनगरवाडी,वेहेळे भोजनेवाडी,डेरवण धनगरवाडी,सावर्डे धनगरवाडी,पोफळी एनाचे तळे आणि करजवाडा १ व २, तळसर शेवरीचा दंड,कोळकेवाडी जांभरई, वाडसाडी,मालदोली भोईवाडी,भिले भोईवाडी या भागांतील नागरिकांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागत होते. अंधार पडल्यानंतर घराबाहेर पडणे म्हणजे धाडसाचं काम.रस्ते अंधारात भिती,महिलांना आणि वृद्धांना सुरक्षिततेची चिंता तर वन्यप्राण्यांच्या उपस्थितीमुळे कायम असणारा जीवघेणा धोका ही परिस्थिती होती पण आता हे चित्र बदलणार आहे. या सौर पथदीपांमुळे नागरिकांना रात्री अपरात्री सुरक्षितपणे प्रवास करता येणार आहे,वीज बिलाचा कोणताही खर्च होणार नाही,कारण पथदीप सौर उर्जेवर चालणारे आहेत,आणि वन्यप्राण्यांच्या संभाव्य हल्ल्यांपासूनही मोठ्या प्रमाणात बचाव होणार आहे.यामुळे येथील ग्रामस्थानी समाधान व्यक्त केले आहे.

### अमनोरा स्कूलच्या विद्यार्थिनींची रोलर स्केटिंग स्पर्धेत घवघवीत कामगिरी

पुणे (आरंभ पर्व) : पुण्यातील अमनोरा स्कूलच्या विद्यार्थिनींनी एलएक्सटी ओपन रोलर स्केटिंग चॅम्पियनशिप २०२५ मध्ये उत्तम कामगिरी करत पदकांची कमाई केली आहे. कसरसाई येथे पार पडलेल्या या स्पर्धेत गौरी रॉय हिने रौप्य पदक तर आध्या पवार हिने कांस्य पदक पटकावून शाळेचा मान उंचावला. रोलर स्केटिंग या खेळात शारीरिक तसेच मानसिक ताकद आणि चिकाटी आवश्यक असते. गौरी आणि आध्याने आपल्या मेहनती व जिद्दीच्या जोरावर यश संपादन करत इतर स्पर्धकांना मागे टाकले. या विजयानंतर अमनोरा स्कूलच्या प्रिन्सिपल मीरा नायर म्हणाल्या, "गौरी आणि आध्याने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्यांच्या कर्तृत्वाचा आम्हाला अभिमान आहे. भविष्यात त्या आणखी मोठ्या यशाची शिखरे सर करतील, असा आम्हाला विश्वास आहे. अमनोरा स्कूल विद्यार्थ्यांच्या गुणांना वाव देऊन त्यांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्यास सदैव कटिबद्ध आहे."

# राजगुरू महाविद्यालयात 'जागर कवितांचा' उत्साहात

**किरण खुडे**

## कवितेमुळे जगण्याला जिवंतपणा येतो - बाबाजी काळे




**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

जिथे जिथे कविता येते, तेथे तेथे जगण्याला नाजूकपणा, जिवंतपणा, रसिकता येते त्यामुळे विद्यार्थ्यांनी कवितेचा संस्कार अंगी रुजवायला हवा. असे आवाहन आमदार बाबाजी काळे यांनी केले. ते खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या वर्षपूर्तीनिमित्त आयोजित 'जागर कवितांचा' या काव्यवाचनाच्या कार्यक्रमात बोलत होते.

या कार्यक्रमात संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे, पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण, राष्ट्रवादी कॉंग्रेस प्रदेश महिला उपाध्यक्षा अ‍ॅड. राजमाला बुट्टे पाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, प्रमोद गाणू, अ‍ॅड. बाळासाहेब लिंभोरे, कल्याणशिल देखणे, डॉ. नीलम गायकवाड, राजगुरुनगर सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष दिनेश ओसवाल, राजेंद्र सांडभोर, प्राचार्य शिरीष पिंगळे, नंदा कड, खेड तालुका पत्रकार संघाचे सचिव किरण खुडे, पत्रकार सुनिल थिगळे, कोंडीभाऊ पाचारणे, निवेदक कैलास दुधाळे, कैलास मुसळे, गणेश आहेरकर, लायन्स क्लबचे अ‍ॅड. दीपक गुरव, पुष्पलता जाधव आदी अतिथी मान्यवरांनी कविता सादर करून विद्यार्थी व श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

आमदार बाबाजी काळे यांनी पुढे बोलताना, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवत असलेल्या विविध उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त करून संस्थेच्या वाटचालीत सोबत राहण्याचा मनोदय व्यक्त केला.

या काव्यवाचन कार्यक्रमात पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण यांनी अनेक स्वलिखित चारोळ्या सादर केल्या.

शाळेतला विद्यार्थी माझ्यातला स्नेह जागवतो, मला तो राष्ट्रनिर्मितीचा मूर्तिमंत पुतळा भासतो' या चारोळीला विद्यार्थ्यांनी टाळ्या वाजवून दाद दिली. पत्रकार किरण खुडे, यांनी 'सब घोडे बारा टक्के' ही विंदा करंदीकर यांची कविता सादर करून राजकीय व्यवस्थेवर भाष्य केले. अ‍ॅड. राजमाला बुट्टे पाटील यांनी वृद्धाश्रमात राहणाऱ्यांची भावनिक व्यथा मांडली. त्यांच्या प्रभावी सादरीकरणाने उपस्थितांची मने हेलावली. हिरामण सातकर यांनी कवितेतून आईची महती सांगितली. डॉ. नीलम गायकवाड यांनी प्रेमावरील गझल सादर करून विद्यार्थ्यांची वाहवा मिळवली. अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी संत तुकडोजी महाराजांची 'या झोपडीत माझ्या' ही कविता सादर केली तर नानासाहेब टाकळकर यांनी कविता गाऊन दाखवल्याने कार्यक्रमाची रंगत उत्तरोत्तर वाढत गेली.

महाविद्यालयातील सर्व महिला प्राध्यापकांनी त्यांच्या निवेदनातून मराठी कवितेच्या परंपरेचा आढावा घेतला. सर्व निमंत्रितांना मराठी विभागाच्या वतीने अभिजात कवितांच्या प्रतिमा भेट देण्यात आल्या.

सूत्रसंचालन प्रा. उमेश जगताप, प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे तर आभार डॉ. बाबासाहेब अनुसे यांनी मानले.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर

**किरण खुडे**

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील ३२ जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत घेण्याचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. या कार्यक्रमानुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी राखीव जागांची प्राथमिक प्रस्तावना जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांच्या पातळीवर ६ ऑक्टोबर २०२४ पर्यंत सादर करावयाची आहे. त्यानंतर १० ऑक्टोबर २०२४ रोजी अनुसूचित जाती-जमातींसाठी तसेच महिला प्रवर्गासाठी आरक्षणाची सोडत जिल्हाधिकारी कार्यालयात काढण्यात येणार आहे. २३ ऑक्टोबर रोजी जिल्हा परिषद निवडणुक विभागासाठी आणि पंचायत समित्यांच्या गणनेसाठी तहसीलदारांकडून कार्यवाही होईल. त्यानंतर २४ ऑक्टोबर रोजी प्रारंभ आरक्षणाची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे. २४ ऑक्टोबर ते २६ ऑक्टोबर या कालावधीत अधिसूचना प्रसिद्ध करून त्यावर हरकती व सूचना मागवण्यात येतील. प्राप्त हरकती व सूचना विचारात घेऊन ३१ ऑक्टोबरपर्यंत विभागीय आयुक्तांकडे अहवाल सादर करण्यात येईल. त्यानुसार २ नोव्हेंबर २०२४ रोजी अंतिम आरक्षण अधिसूचना प्रसिद्ध होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या वेळापत्रकानुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षणाची प्रक्रिया निश्चित तारखांना पार पडणार असून सर्व जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांना त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## सूर्यदत्त नॅशनल स्कुलची 'नाबेट' मानांकनात बाजी

- दर्जेदार शिक्षणासाठीच्या 'नाबेट'च्या मानांकनात
- 'सीबीएसई' संलग्नित सूर्यदत्त नॅशनल स्कुलचे यश



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दी क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडियाची घटक संस्था असलेल्या दी नॅशनल अक्रेडिएशन बोर्ड फॉर एज्युकेशन अँड ट्रेनिंगच्या (नाबेट) मानांकनात सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्त नॅशनल स्कुलला घवघवीत यश मिळाले आहे. दर्जेदार शिक्षणाच्या प्रवासात मिळालेला हा पुरस्कार 'सूर्यदत्त'च्या प्रगतीतील महत्वाचा टप्पा आहे. ही मान्यता शाळेच्या उत्कृष्ट दर्जाच्या शालेय प्रशासनाप्रती असलेल्या ठाम वचनबद्धतेचे, सर्वांगीण विकासाच्या ध्येयाचे आणि प्रेमळ तसेच सर्वसमावेशक शिकण्याच्या वातावरणाच्या जपणुकीचे प्रतीक आहे.

'नाबेट' ही अतिशय प्रतिष्ठित अशी संस्था असून, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मानदंडाची पूर्तता करणाऱ्या शैक्षणिक संस्थांना मानांकन देऊन गौरव करते. 'नाबेट' मानांकन हे गुणवत्तेच्या हमीचे प्रतीक असून, संस्थेच्या प्रशासन, शैक्षणिक गुणवत्ता, पायाभूत सुविधा, सुरक्षितता आणि विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या सहाय्य या सर्व क्षेत्रांतील सर्वोत्तम पद्धतींचे पालन दर्शवते.

२०१४ साली पुण्यातील बावधन येथे स्थापन झालेली सूर्यदत्त नॅशनल स्कूल ही सर्वांगीण व विद्यार्थी-केंद्रित शिक्षण अनुभव देण्यास कटिबद्ध असलेली एक अग्रगण्य शाळा आहे. शाळेने व्यापक मानांकन प्रक्रिया पूर्ण करत कार्यप्रणालीचे १५ मानके आणि ५० मापदंडांच्या आधारे काटेकोर मूल्यमापन झाले. यातून शाळेच्या प्रशासन व शैक्षणिक आराखड्याचा सर्वांगीण आढावा घेतला गेला. जानेवारी २०२५ मध्ये तीन अनुभवी मूल्यांकनकर्त्यांचा समावेश असलेल्या 'नाबेट'च्या लेखापरीक्षण पथकाने शाळेला भेट देऊन सखोल मूल्यांकन केले.

प्रमुख हितधारकांसोबत प्रारंभीची बैठक व शाळेची दृष्टीकोन व यशांविषयी सादरीकरण, दस्तऐवजांचे परीक्षण, नोंदी व अहवालांचे निरीक्षण, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांची मुलाखत घेऊन अभिप्राय व दृष्टिकोनाची नोंद, वर्ग निरीक्षण करून अध्यापन-शिकण्या प्रक्रियेचे मूल्यमापन, पायाभूत सुविधा व सोयीसुविधांची पाहणी, आरोग्य व सुरक्षिततेच्या उपाययोजना याविषयी तपासणी झाली. शाळेची माहिती, शासन, नेतृत्व आणि प्रशासन, ध्येय व उद्दिष्टे, दस्तऐवजीकरण, आर्थिक संसाधने, भौतिक पायाभूत सुविधा व सहाय्यक सुविधा, मानव संसाधन व्यवस्थापन, अभ्यासक्रम व शैक्षणिक कार्यक्रम, अध्यापन-शिकण्याची प्रक्रिया, मूल्यमापन व आढावा, प्रवेश प्रक्रिया, मार्गदर्शन व समुपदेशन सेवा, शैक्षणिक साधने, आरोग्य व सुरक्षा उपाययोजना, जोखमी व संधी, शाळेच्या कार्यप्रदर्शनाचे मोजमाप व सुधारणा अशा विविध मानकांद्वारे हे मूल्यांकन करण्यात आले.

## श्रीनाथ पतसंस्थेचा रौप्यमहोत्सवी सोहळा साजरा

### सभासदांना १४ टक्के लाभांश सह भेट वस्तू



**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

कुंजीरवाडी (ता. हवेली) येथील श्रीनाथ पतसंस्थेला ६ सप्टेबंर २०२५ ला २५ वर्षे पुर्ण झाली. त्यानिमित्ताने पतसंस्था रौप्य मोहत्सवी वर्ष साजरे करीत आहे. संस्थेने विविध

उपक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये सभासद करिता महाआरोग्यशिबीर, प्रशिक्षण शिबीर, वार्षिक सभा आणि रौप्य महोत्सव सोहळा यांचा समावेश होता.या कार्यक्रमास राज्यचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, दौंडचे माजी आमदार रमेश थोरात, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँक संचालक सुरेश घुले, पुणे जिल्हा पतसंस्था फेडरेशन अध्यक्षा सौ रेशमाताई भोसले आदि उपस्थित होते. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी संस्थेचा गौरव करुन सभासदांना मार्गदर्शन केले .संस्थेचे अध्यक्ष संदिप सुखारज धुमाळ व सर्व संचालक मंडळ यांचे संस्था चांगल्या प्रकारे चालवित असल्याबद्दल कौतुक केले .

यावेळी संस्था २५ वर्ष पूर्ण करत आहे हा सर्व प्रवास सभासदांच्या विश्वासावर शक्य झाला आहे त्या निमिताने एक कृतज्ञता म्हणून सभासदांना भेट वस्तू यामध्ये ट्रँव्हल्स बँग, डिनर सेट, टिफिन सेट आदिचे वाटप प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात करण्यात आले. तसेच संस्थेला अहवाला वर्षात १ कोटी ५० लाख रुपये निव्वळ नफा झाला असून, संस्थेच्या सभासंदाना १४ टक्के लाभांश संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संदीप धुमाळ यांनी जाहीर केला.तसेच

महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असलेल्या श्रीनाथ पतसंस्थेची २५वी वार्षिक साधारण सभा नुकतीच झाली. संस्था आपल्या बँकिंग कार्या सोबत सामाजिक बांधिलकीची जोपासना करत आहे.

वार्षिक सभेच्या निमित्ताने विविध सामाजिक क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करणारे मान्यवर आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा 'श्रीनाथ गुण गौरव पुरस्कार २०२५' देऊन गौरव केला. यामध्ये पंचक्रोशीतील गुणवंत विद्यार्थी, तसेच विविध पदावर नियुक्त झालेले सभासद खातेदार यामध्ये ज्ञानेश्वर धुमाळ , सौ सुनिता धुमाळ, गणेश आंबेकर, राजाराम काकडे, सचिन मोहन धुमाळ यांचा सन्मान करण्यात आला.

या पतसंस्थेला सन २०२४-२०२५ वर्षात १ कोटी ५० लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला असून, ३१ मार्च २०२५ अखेर ४१ कोटी ७९ लाख रुपयांच्या ठेवी आहेत. पतसंस्थेने ३४ कोटी ३६ लाख रुपयाचे कर्ज वाटप केले असून, गुंतवणूक २२ कोटी ८० लाख रुपयांची केली आहे.

संस्थेचे एकूण खेळते भांडवल ६१ कोटी रुपये असून, संस्थेची वसुली ९१.६७ टक्के असून, एनपीए शून्य टक्के आहे, अशी माहिती अध्यक्ष संदीप धुमाळ यांनी दिली.

सभेचे अहवाल वाचन व सूत्रसंचालन संस्थेचे कार्यकारी संचालक ज्ञानेश्वर धुमाळ यांनी केले.

यावेळी पतसंस्थेचे उपाध्यक्ष संभाजी आंबेकर, महादेव धुमाळ, माजी सरपंच सचिन तुपे, माजी सरपंच सौ सुनीता धुमाळ, सौ वैशाली मेमाणे, राहुल धुमाळ, दीपक खटाटे, सुभाष गाडवे, अजय कुंजीर, राजेंद्र गायकवाड, उमेश राखपसरे, विश्वनाथ रूपनर, पोपट चौधरी, दत्तात्रेय कुंजीर आणि व्यवस्थापक शिवाजी जावळे आदी उपस्थित होते.

## राजगुरू महाविद्यालयात हादगा - भोंडला उत्सव साजरा



**किरण खुडे**

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय, पॉलिटेक्निक कॉलेज, एमबीए कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने शारदीय नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने पारंपरिक हादगा - भोंडला कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

याप्रसंगी संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, अ‍ॅड. बाळासाहेब लिंभोरे पाटील, प्राचार्य डॉ. एस.एस. पिंगळे, प्राचार्य डॉ.एच.एम.जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी.कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. बी.दौंडकर, प्रा. एस.टी.फुंदे यांच्यासह सर्व महिला प्राध्यापिका आणि मोठ्या संख्येने विद्यार्थिनी पारंपरिक वेशभूषेत उपस्थित होत्या. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हत्तीचे विधिवत पूजन करण्यात आले. विद्यार्थिनींना शुभेच्छा देताना अ‍ॅड. बाळासाहेब लिंभोरे पाटील म्हणाले की, भोंडला आणि हादग्याचा उत्सव नवचैतन्याचा असून ते आपल्या लोकसंस्कृतीचे खास वैशिष्ट्ये आहे. हा लोकपरंपरेचा अनमोल वारसा आपण जतन करायला हवा. आदिशक्तीच्या रूपातील विद्यार्थिनींनी स्वतःला सर्वार्थाने समृद्ध करावे असे आवाहन त्यांनी केले. या वेळी विद्यार्थिनींनी फेर धरून ऐलमा पैलमा गणेश देवा, नदीच्या पलिकडे, काळी चंद्रकळा, एक लिंबू झेलू आदी पारंपरिक गीतांच्या तालावर ठेका धरला आणि दांडिया नृत्याचा आनंद लुटला. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. राजश्री सावंत, डॉ. रूपाली कातोरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. नीता डोंगरे, डॉ. सोनल धानापुने, प्रा. प्राची शिंदेकर यांनी तर आभार डॉ. रूपाली कातोरे यांनी मानले.

# "ही लढाई जनतेच्या विश्वासाची, प्रभागाच्या विकासासाठी : मोरे

## भूपेंद्र मोरे यांची कार्यकर्त्यासमवेत बैठक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या तयारीला सुरुवात झाली असून सामाजिक कार्यकर्ते श्री.भूपेंद्र मोरे यांनी मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयात कार्यकर्त्यांची बैठक घेतली.

या बैठकीत निवडणुकीसाठीची रणनीती, कार्यकर्त्यांची जबाबदारी, ज्येष्ठांचे मार्गदर्शन आणि महिलाभगिनींचा पाठिंबा या सर्व बाबींवर चर्चा झाली.

"आजवर मी तुमच्यासाठी शक्य ते प्रयत्न केले. आता प्रभागाच्या विकासासाठी आपण सारे एकत्र यायला हवे. ही लढाई केवळ राजकारणाची नाही, तर जनतेच्या विश्वासाची आहे. असंख्य प्रेम करणाऱ्या माझ्या सर्व स्तरातील नागरिकांना मी आश्वस्त करतो की, आपण ही लढाई नक्कीच जिंकणार आहोत." असे बोलत सर्वांना भावनिक आवाहन केले..

त्यांनी पुढे स्पष्ट केले की, "आपला उद्देश केवळ प्रभागाचा सर्वांगीण विकास आहे. रस्ते, पाणी, स्वच्छता, आरोग्य या मूलभूत सोयीसुविधा प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्यासाठी आपण झटणार आहोत. पण यासाठी तुमच्या सहकार्याची आणि एकतेची गरज आहे."

शेतकऱ्याच्या मुलाला नगरसेवक करण्याची संधी तुम्हाला आली आहे ती निश्चितपणे तुम्ही पूर्ण करावी.. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी उपस्थित नागरिकांनी मोरे यांच्या कार्याचे कौतुक व्यक्त केले. आगामी निवडणुकीत तुमच्या पाठीशी राहणार असल्याचा निर्धार अनेक नागरिकांनीही बोलून दाखवला.




बैठकीनंतर कार्यकर्त्यांमध्ये नवीन ऊर्जा आणि आत्मविश्वास दिसून आला. नागरिकांच्या पाठिंब्यावर आणि सहकाऱ्यांच्या मेहनतीवर विश्वास ठेवून भूपेंद्र मोरे यांनी विजयाचा ध्यास घेतल्याचे स्पष्ट दिसत होते.

प्रभागाच्या विकासासाठी आणि जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आपण सारे एकत्र आलो, तर विजय नक्की आहे, असा ठाम विश्वास ह्या बैठकीनिमित्त कार्यकर्त्यांमध्ये दृढ झाला.

श्री.भूपेंद्र मोरे यांनी ही बैठक घेऊन एक प्रकारे निवडणुकीचे रणशिंग फुंकल्याचे ह्या निम्मित पाहायला मिळाले.

यावेळी भूषण मोरे,राजाभाऊ जाधव, विठ्ठल सूर्यवंशी, हरीश वैद्य, लतिफ शेख, प्रशिक दारुंडे, सुनील पढेर, सुशील भागवत, सुरज दांगडे, सोनाली नायर, यांच्यासह विविध कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# अंतिम प्रभागरचना जाहीर

## कोठे तक्रारींची दखल; कोठे राजकीय सोय; इच्छुकांच्या नजरा आरक्षणाच्या सोडतीकडे




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठीची अंतिम प्रभागरचना जाहीर झाली आहे. प्रारूप प्रभागरचनेत काही ठिकाणी नागरिकांच्या तक्रारींची दखल घेण्यात आली आहे, तर काही ठिकाणी राजकीय सोय बघून प्रभागांमध्ये बदल करण्यात आले आहेत. ही प्रभागरचना अंतिम झाल्याने इच्छुक उमेदवारांच्या नजरा आता आरक्षणाच्या सोडतीकडे लागल्या आहेत.

पुणे महापालिकेच्या निवडणुका या वेळेवर पार न पडल्याने मार्च २०२२ पासून प्रशासक राजवट सुरू आहे. गेल्या सव्वातीन वर्षांपासून निवडणुका न झाल्याने अखेर यात सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करून चार महिन्यांत निवडणुका घेण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी वेळापत्रक जाहीर केले. त्यानुसार पुणे महापालिकेची प्रारूप प्रभागरचना करण्याचे काम प्रशासनाने सुरु केले. राज्य निवडणूक आयोगाने २२ ऑगस्ट रोजी प्रारूप प्रभागरचना जाहीर केली होती. ही प्रभागरचना करताना समाविष्ट गावे अनेक प्रभागांना जोडले.

त्यामुळे उपनगरांमधील प्रभाग मोठे तर मध्यवर्ती भागातील प्रभाग लहान झाले आहेत. अनेक ठिकाणी नैसर्गिक हद्दी ओलांडून प्रभाग तयार केले आहेत. त्यामुळे नागरिकांनी हरकती सूचनांचा पाऊस पाडला. प्रशासनाकडे पाच हजार ९२२ हरकती सूचना नोंदविल्या गेल्या. त्यावर राज्य शासनाकडून प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांमार्फत दोन दिवस सुनावणी झाली. त्यानंतर प्रभागरचनेतील बदलांसह त्याचा अहवाल राज्य शासनास सादर झाला. त्यास निवडणूक आयोगाकडून शुक्रवारी (ता. ३) मान्यता दिल्यानंतर आज (ता. ४) अंतिम प्रभाग रचना जाहीर करण्यात आली आहे.

प्रारूप प्रभाग रचनेवर ५ हजार ९२२ हरकती सूचना आल्या होत्या. यातील १ हजार ३२९ हरकती पूर्ण मान्य करण्यात आल्या असून, ६९ हरकतीं अंशतः मान्य करून बदल केले आहेत. तर ४ हजार ५२४ हरकती नामंजूर करण्यात आल्या आहेत. हरकती सूचनेनंतर प्रभाग क्रमांक १, ४, १४, १५, १७, १८, २०, २४, २७, ३४, ३८, ३९ येथील हद्दीमध्ये बदल झाले आहेत. मध्यवर्ती भागापेक्षा उपनगरांमध्ये बदल जास्त झाले आहेत.

सत्तेत असूनही प्रभागरचनेत फायदा होत नसल्याने राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नाराजीचा सूर होता. याबाबत उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडे पदाधिकाऱ्यांनी तक्रार केल्यानंतर त्यांनी आता रडत बसू नका. निवडणूक जिंकण्याची तयारी करा, असे आदेश दिले; पण प्रभागरचना करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विश्वासात घेऊ, असे सांगितले होते.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी त्यांच्या मनाप्रमाणे प्रभागरचना केली. आपल्याला विश्वास घेतले नाही, अशी टीका करत त्यांची तुलना थेट माजी खासदार सुरेश कलमाडी यांच्यासोबत केली होती. त्यामुळे पुढील काळात पवार विरुद्ध मोहोळ असा संघर्ष होऊ नये, यासाठी प्रभागरचना अंतिम करताना काही महत्त्वाचे बदल केले जातील, अशी चर्चा होती. पण त्यातून फारसे राष्ट्रवादी काँग्रेसच्या हाताला लागलेले नाही.

### पाच सदस्यांच्या प्रभागात मोठे फेरबदल

**प्रभाग क्रमांक ३८ कात्रज आंबेगाव या प्रभागात मोठ्या प्रभागात बदल झाला. या प्रभागाचे नाव बदलून बालाजीनगर-कात्रज-आंबेगाव असे नवे नाव निश्चित केले आहे. हा प्रभाग पाच सदस्याचा असताना त्याला आता आणखी नवीन भाग जोडण्यात आला आहे. त्यामध्ये प्रभाग क्रमांक २० बिबवेवाडी- महेश सोसायटी या प्रभागातील केके मार्केट येथील पुण्याई नगरचा भाग प्रभाग क्रमांक ३८ ला जोडला आहे. प्रभाग क्रमांक ३४ नऱ्हे-वडगाव बुद्रुकचा काही भाग हा प्रभाग क्रमांक ३८ ला जोडला आहे. त्याच प्रमाणे कोळेवाडी, जांभूळवाडी हा भाग देखील या प्रभागाला जोडला गेला आहे. तर प्रभाग क्रमांक ३८ मधील सुखसागरनगरचा भाग काढून तो प्रभाग क्रमांक ३९ अप्परसुपर - इंदिरानगरला जोडण्यात आला आहे.**

### दादांच्या मागणीकडे दुर्लक्ष

**पुणे महापालिकेची प्रारूप प्रभागरचना ही पूर्णपणे भाजपच्या पथ्यावर पडणारी असल्याने आणि त्यात राष्ट्रवादी काँग्रेसला विश्वासात न घेतल्याने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर अंतिम प्रभागरचना करताना राष्ट्रवादीला पोषक असे काही बदल केले जातील, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र काही किरकोळ बदल केले आहेत; पण यानिमित्ताने भाजपने प्रारूप प्रभागरचनेत झालेल्या चुका अंतिम प्रभागरचना करताना सुधारल्याचेही समोर आले आहे. पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाने प्रारूप प्रभागरचना जाहीर केल्यानंतर त्यात मध्यवर्ती पेठांच्या भागात मोठे बदल नाहीत. पण उपनगरांमधील प्रभागांमध्ये उलथापालथ झाली. भाजपच्या नगरसेवकांचे प्रभाग सुरक्षित राहिले; पण महायुतीतील घटकपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसपुढे मोठे आव्हान निर्माण झाले. राष्ट्रवादीचा प्रभाव असणाऱ्या वडगाव शेरी, हडपसर, खडकवासला विधानसभा मतदारसंघांतच त्यांची कोंडी झाली. यात माजी महापौर दत्ता धनकवडे यांचा भाग हा पाच प्रभागांमध्ये विभागला गेल्याने त्यांना कोणत्या प्रभागातून निवडणूक लढवायची असा प्रश्न पडला होता. राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष, माजी आमदार सुनील टिंगरे यांचा प्रभाग असलेला टिंगरेनगर गल्ली क्रमांक १४, बार्मीशेल झोपडपट्टी हा भाग त्यांच्या प्रभागातून तोडून विमाननगरला जोडला आहे. त्यांच्या बंधूंसाठी हा प्रभाग हवा तेवढा सुरक्षित करता आला नाही. यामध्ये टिंगरे विरोधक मुळीक व पठारे हेच सुरक्षित असल्याचे समोर आले. त्याचप्रमाणे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष या पक्षांच्या इच्छुकांचीही अडचण झाली आहे.**

### या प्रभागांच्या हद्दी बदलल्या

**प्रारूप प्रभाग रचनेवर ५ हजार ९२२ हरकती सूचना आल्या होत्या. यातील १ हजार ३२९ हरकती पूर्ण मान्य करण्यात आल्या असून, ६९ हरकतींचा अंशतः मान्य करून बदल केले आहेत. तर ४ हजार ५२४ हरकती नामंजूर करण्यात आल्या आहेत. हरकती सूचनेनंतर प्रभाग क्रमांक १, ४, १४, १५, १७, १८, २०, २४, २७, ३४, ३८, ३९ येथील हद्दीमध्ये बदल झाले आहेत. मध्यवर्ती भागापेक्षा उपनगरांमध्ये बदल जास्त झाले आहेत.**

### बालाजीनगरचा बदल भाजपच्याच सोयीसाठी

**बालाजीनगरचा भाग हा प्रभाग क्रमांक ३८ या पाच सदस्यांच्या प्रभागाला जोडला गेल्याने माजी महापौर दत्ता धनकवडे यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा आहे. पण प्रत्यक्षात प्रभाग क्रमांक ३९ मधील बालाजीनगरचा भाग वगळून तो ३८ ला जोडला आहे. यातून भाजपने प्रभाग क्रमांक ३९ सुरक्षित करून घेतला आहे, तर बालाजीनगरचा भाग प्रभाग ३८ ला जोडल्याने येथील लोकसंख्या १ लाख २३ हजार ९८१ इतकी झाली असून, त्यात बालाजीनगरची सुमारे २५ हजार लोकसंख्या आहे. त्यामुळे या बदलाचा आता धनकवडे यांचा फायदा कसा होणार, असा प्रश्न निर्माण होत आहे. शिवाय शिवसेनेलाही याचा फटका बसण्याची शक्यता आहे.**

### थिटेवस्तीचा बदल राजकीय

**मांजरी बुद्रुक, केशवनगर या प्रभाग क्रमांक १५ मध्ये खराडीतील थिटेवस्तीचा भाग जोडला होता. त्याला स्थानिक नागरिकांनी प्रचंड विरोध केला होता. त्यानुसार हा भाग या प्रभागातून वगळून प्रभाग क्रमांक ४ला जोडून नैसर्गिक हद्दीचे पालन केले आहे, असे सांगितले जात आहे. पण प्रत्यक्षात यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातील एक नेता भाजपमध्ये येणार असल्याने त्यांच्या सोयीसाठी राजकीय बदल केल्याची चर्चा आहे.**

### कोरेगाव पार्क, मुंढवा, रामटेकडी येथे बदल

**निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या अंतिम प्रभागरचनेमध्ये प्रभाग क्रमांक १८ वानवडी- साळुंके विहार या प्रभागातील शिंदे वस्तीचा भाग, प्रभाग क्रमांक १४ कोरेगाव पार्क-घोरपडी- मुंढवा या भागाला जोडला आहे. प्रारूप रचनेमध्ये शिंदे वस्तीच्या रस्त्याने विभाजन झाले होते, हा भाग एकत्र करण्यात आला आहे. प्रभाग क्रमांक १४ कोरेगाव पार्क-घोरपडी- मुंढवा येथील मगरपट्टा सिटी रस्त्याच्या समोरील भाग हा प्रभाग क्रमांक १७ रामटेकडी- माळवाडी- वैदुवाडी याला जोडण्यात आला आहे.**

### आठ प्रभागांची नावे बदलली

| प्रभाग | बदललेले नाव | जुने नाव |
|---|---|---|
| १ | कळस-धानोरी-लोहगाव उर्वरित | कळस-धानोरी |
| १४ | कोरेगाव पार्क-घोरपडी- मुंढवा | कोरेगाव पार्क-मुंढवा |
| १५ | मांजरी बुद्रूक-केशवनगर-साडेसतरा नळी | मांजरी बुद्रूक- साडेसतरा नळी |
| १७ | रामटेकडी-माळवाडी-वैदुवाडी | रामटेकडी- माळवाडी |
| २० | शंकर महाराज मठ-बिबवेवाडी | बिबवेवाडी-महेश सोसायटी |
| २४ | कसबा गणपती-कमला नेहरू हॉस्पिटल - केईएम रुग्णालय | कमला नेहरू रुग्णालय- रास्ता पेठ |
| २६ | घोरपडे पेठ-गुरुवार पेठ-समताभूमी | गुरुवार पेठ-घोरपडे पेठ |
| ३८ | बालाजी नगर-आंबेगाव-कात्रज | आंबेगाव-कात्रज |

## थोडक्यात पण महत्वाचे

### हळवी बाजू मांडणाऱ्या 'तू माझा किनारा'चा पोस्टर प्रदर्शित

**पुणे (आरंभ पर्व) : तू माझा किनारा चित्रपटाचा नुकत्याच प्रदर्शित झालेल्या मोशन पोस्टरमध्ये छोट्या मुलीच्या आवाजाने प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता निर्माण केली होती. या कुटुंबामागचं खरं गूढ काय? पोस्टरमधील आई म्हणजेच केतकी नारायण आणि बाबा म्हणजेच भूषण प्रधान तर नाहीत? लायन हार्ट प्रॉडक्शन प्रा. लि. प्रस्तुत "तू माझा किनारा" या मराठी चित्रपटाचा पहिला अधिकृत पोस्टर नुकताच प्रदर्शित झाला असून त्याने प्रेक्षकांच्या मनात उत्सुकतेची नवी लहर निर्माण केली आहे. पोस्टरमध्ये दिसणारं केतकी, भूषण आणि केया यांचं हसतमुख क्षणचित्र पहिल्या नजरेला आनंदाचं वाटतं. पण त्या नजरेमागे नात्यांची एक वेगळी छटा दडलेली आहे, असं वाटत आहे. जी प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडते. "तू माझा किनारा" हा केवळ कुटुंबकेंद्री सिनेमा नाही, तर प्रत्येक घरात घडणाऱ्या भावनिक प्रवासाचा आरसा आहे. या चित्रपटाची निर्मिती जॉइसी पॉल जॉय यांनी केली असून, सह-निर्माते सिबी जोसेफ आणि जॅकब जेव्हियर आहेत. कथा, पटकथा आणि दिग्दर्शन क्रिस्टस स्टीफन यांचे असून, त्यांनी कुटुंबातील नात्यांची गुंतागुंत संवेदनशीलतेने उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. रूपांतरित पटकथा आणि संवाद चेतन किंजळकर यांनी लिहिले आहेत. छायांकन एल्धो आयझॅक यांचे असून, कथानकाला वास्तववादी स्पर्श देण्याचं मोठं काम त्यांच्या कॅमेऱ्याने केलं आहे. संकलन सुबोध नारकर यांनी केले असून अनिल केदार यांनी कला दिग्दर्शन केले आहे. "तू माझा किनारा" हा भावनिक प्रवास ३१ ऑक्टोबर रोजी सर्व चित्रपटगृहांत प्रदर्शित होत आहे. चित्रपटात मुक्ताच्या भूमिकेत सुप्रसिद्ध इंस्टाग्राम स्टार केया इंगळे असून भूषण प्रधान आणि केतकी नारायण यांची पात्र अजून उलगडली गेली नाहीत. पोस्टर पाहून प्रेक्षकांना लगेच जाणवतं की हा चित्रपट केवळ एका कुटुंबाची कथा नाही, तर प्रत्येक घरातल्या नात्यांचा आरसा आहे. कधी आनंद, कधी ओझं, कधी हसू आणि कधी आसवं या सर्व भावनांचा किनारा प्रेक्षकांना या चित्रपटात सापडेल.**

### जाखमाता देवी जागृत देवस्थान नवरात्र उत्सवात भाविकांची गर्दी

**राजगुरूनगर (आरंभ पर्व) : राजगुरूनगर : शिरोली (ता. खेड) येथील भीमा नदीकाठावरील जाखमाता अंबिका देवी जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. पंचक्रोशीतून नवरात्र महोत्सवात येथे भाविकांची दर्शनासाठी गर्दी होते. मंदिर परिसरात नवरात्र उत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नवसाला पावणारी देवी अशी भाविकांची श्रद्धा आहे. प्राचीन काळी दळणवळणाची साधने नसल्यामुळे पायी अथवा घोडा, बैल किंवा इतर पाळीव पशुंचा वापर करुन प्रवास होत असे. त्याकाळी लोहगड - आंबेगाव या ठिकाणी भातपीकांचे उत्पादन चांगले होत असल्यामुळे तेथून लमाण समाजाचे लोक गाढवावरून तांदळाचे गाठोडे व्यापारासाठी घेऊन या भागात येत असत. त्यांचा मुक्काम भीमानदीकाठी शिरोली येथील माळरानावर होत असे. एकदा ते मुक्कामाला येथे थांबले होते. पुन्हा सकाळी पुढच्या गावाला जाण्यासाठी तांदळांची गाठोडी गाढवावर लादत होते. त्यामधील एक तांदळाचे गाठोडे अनेक प्रयत्न करुनही जागेवरून हाललेच नाही. त्यांनी ते गाठोडे तेथेच सोडून दिले. गावकऱ्यांनीही हे तांदळाचे गाठोडे उचलण्याचा खुप प्रयत्न केला तोही असफल झाला. याच तांदळात गुप्त रुपाने देवी आली. आणि येथील शिंदीचे बन व निसर्गरम्य परिसर पाहुन येथेच राहीली. अशी आख्याईका सांगितली जाते. भाविकांची देवीवर अपार श्रद्धा आहे. गावकऱ्यांनी एकत्र येत यांच तांदळाच्या गाठोड्यावरती लहानसे मंदिर उभारून तांदळा स्वरूपात देवीची पुजाअर्चा करण्यास सुरुवात केली.**

## हार्ट अटॅक मृत्यू रोखण्यासाठी 'STEMI केअर प्रोग्राम'ची सुरुवात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हार्ट अटॅकमुळे होणारे मृत्यू कमी करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, ज्युपिटर हॉस्पिटलने 'कोड ब्राउन - STEMI प्रोटोकॉल' या विशेष तातडीच्या उपाययोजनेची सुरूवात केली आहे. ST-Elevation Myocardial Infarction (STEMI) हा हार्ट अटॅकचा सर्वात तीव्र आणि जिवावर बेतणारा प्रकार असून, त्यासाठी वेळेवर निदान व उपचार अत्यंत महत्त्वाचे असतात. हा नवीन प्रोग्राम त्वरित निदान, हॉस्पिटलमधील विविध विभागांमधील समन्वय आणि तत्काळ उपचार यावर लक्ष केंद्रित करतो, ज्यामुळे जीव वाचवणे आणि हृदयाचे कार्य सुरक्षित ठेवणे शक्य होते.

हा प्रोग्राम संपूर्ण हॉस्पिटलमध्ये समन्वय साधणारी प्रणाली आहे जी STEMI रुग्णांसाठीची आपत्कालीन सेवा जलद आणि कार्यक्षम बनवते. छातीत वेदना आणि ECG मध्ये ST-एलेव्हेशन दिसून आल्यावर, म्हणजेच तीव्र हार्ट अटॅकचा संशय आला की, रुग्ण जेव्हा ज्युपिटर हॉस्पिटलच्या आपत्कालीन विभागात पोहोचतो, तेव्हाच 'कोड ब्राउन' टीम सक्रिय केली जाते. या टीममध्ये आपत्कालीन वैद्यकीय अधिकारी, हृदयरोगतज्ज्ञ, परिचारिका, कॅथ लॅब स्टाफ तसेच बिलिंग, सफाई कर्मचारी, आणि ICU सारख्या सहाय्यक विभागांचा समावेश असतो. सर्व विभाग परस्पर समन्वय साधून हॉस्पिटलमध्येच 'ग्रीन कॉरिडॉर' तयार करतात, ज्यामुळे रुग्ण शक्य तितक्या कमी वेळेत आणि सुरक्षितपणे कॅथ लॅबमध्ये पोहोचवला जातो. प्रत्येक पायरी काळजीपूर्वक नियोजनबद्ध असते, जेणेकरून वेळेचा अपव्यय होऊ नये.

## प्रगल्भ लोकशाहीसाठी बंधुतेचा विचार महत्वपूर्ण : चंद्रकांत दळवी

### सांगोलेकर लिखित 'विश्वबंधुतेची प्रकाशवाट' पुस्तकाचे प्रकाशन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"स्वातंत्र्य आणि समतेला बंधुतेची जोड नसेल, तर लोकशाहीचे स्वरूप अपूर्ण राहते. समाजातील तणाव, दुभंगलेली मने आणि विषमता दूर सार्याची असेल, तर बंधुतेचा विचार जनमानसात रुजणे अत्यंत महत्वाचे आहे. कारण बंधुता ही केवळ एक सामाजिक मूल्य नसून, प्रगल्भ लोकशाहीचा प्राण आहे," असे मत रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन व माजी विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी यांनी व्यक्त केले.




महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनानिमित्त ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अविनाश सांगोलेकर लिखित आणि बंधुता प्रकाशन प्रकाशित 'विश्वबंधुतेची प्रकाशवाट' या पुस्तकाचे प्रकाशन चंद्रकांत दळवी यांचे हस्ते झाले. रयत शिक्षण संस्थेच्या औंध येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात झालेल्या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजनिष्ठ उद्योजक कृष्णकुमार गोयल होते. प्रसंगी बंधुताचार्य प्रकाश रोकडे, मंदाकिनी रोकडे, स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. अरुण आंधळे, प्रा. चंद्रकांत वानखेडे, प्रा. शंकर आथरे, संगीता झिंजुरके, दत्तात्रय गायकवाड, डॉ. प्रभंजन चव्हाण आदी उपस्थित होते.

चंद्रकांत दळवी म्हणाले, "बंधुता चळवळीचा हा प्रवास ५१ वर्षांचा आहे. विविध साहित्य संमेलने, काव्य महोत्सव, बंधुता पुरस्कारांतून बंधुतेचे मूल्य खोलवर रुजवण्याचा रोकडे यांचा प्रयत्न स्तुत्य आहे. समाजाला एकसंध ठेवण्यासाठी आवश्यक बंधुता विचार व्यापक करण्याचा हा प्रवास यापुढेही चालू राहावा."

कृष्णकुमार गोयल म्हणाले, "विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत. ध्येयासक्तीने ती स्वप्ने पूर्ण करण्यासाठी परिश्रम घ्यावेत. आपल्यातील सुप्त गुण ओळखून करिअर घडवण्यासाठी कठोर मेहनत, जिद्द, प्रामाणिकपणा अंगीकारावा. परस्परांचा सन्मान, बंधुभाव जोपासून एकमेकांच्या साथीने राष्ट्राच्या विकासात योगदान द्यावे.

बंधुताचार्य प्रकाश रोकडे म्हणाले, "महामानवांच्या मूल्यविचारांचे बळ, प्रज्ञावंताची दृष्टी, विचारवंतांचे विचार, धनवंतांचे धन आणि सहकारी कार्यकर्त्यांची कृतिशील साथ हे बंधुता चळवळीच्या यशाचे गमक आहे. ही चळवळ अधिक व्यापक होण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करावेत."

# पहिल्या आरोग्य साहित्य संमेलनाध्यक्षपदी डॉ. संजय ओक

## डॉ. स्मिता व डॉ. रवींद्र कोल्हे दांपत्याला पहिला 'महाराष्ट्र आरोग्य भूषण पुरस्कार २०२५' जाहीर

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन; स्वागताध्यक्ष उमेश चव्हाण यांची माहिती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रुग्ण हक्क परिषद, मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष, मंत्रालय, मुंबई आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे आरोग्य महोत्सव आणि पहिल्या आरोग्य साहित्य संमेलनाचे १९ नोव्हेंबर २०२५ रोजी बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे आयोजन केले आहे. या संमेलनाचे उद्घाटन सकाळी ९ वाजता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती स्वागताध्यक्ष उमेश चव्हाण यांनी दिली.



उमेश चव्हाण म्हणाले, "या संमेलनाचे अध्यक्षपद वैद्यकीय क्षेत्रातील प्रसिद्ध लेखक व साहित्यिक डॉ. संजय ओक यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. तसेच, यंदाचा प्रतिष्ठित 'महाराष्ट्र आरोग्य भूषण पुरस्कार २०२५' मेळघाट (जि. अमरावती) येथील पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे आणि डॉ. रवींद्र कोल्हे यांना जाहीर झाला आहे. एक लाख रुपये रोख आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या संमेलनात डॉ. जगन्नाथ दीक्षित, डॉ. प्रमोद जोग, डॉ. प्रदीप आवटे, पुणे मनपा आरोग्य प्रमुख डॉ. नीना बोराडे, आरोग्य उपसंचालक डॉ. भगवान पवार यामध्ये सहभागी होणार आहेत."

दिवसभर संमेलनामध्ये विविध कार्यक्रम होणार आहेत. आरोग्य साहित्य आढावा, चर्चासत्रे, परिसंवाद, कवी संमेलन, संगीत रजनी, व्याख्याने, पुस्तक प्रकाशन आणि स्मरणिका प्रकाशन यांचा समावेश आहे. मुख्यमंत्री फिरता दवाखाना योजनेचे उद्घाटन होणार आहे. कलाकार, साहित्यिक, पत्रकार यांच्यासह २५ हजार पुणेकर नागरिकांची नामांकित डॉक्टरांकडून तपासणी व मोफत औषध तसेच मोफत उपचार व शस्त्रक्रिया शिबीर राबवले जाणार आहे," असे उमेश चव्हाण यांनी नमूद केले.

डॉ. संजय ओक यांनी निवडीबद्दल आनंद व्यक्त करत प्रथमच अशा पद्धतीचे पहिले आरोग्य साहित्य संमेलन पार पडत असून, संमेलनाध्यक्षपदी माझी निवड झाल्याने अधिक जबाबदारी वाढली असल्याचे सांगितले.

पहिल्या आरोग्य साहित्य संमेलनाचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. संजय ओक हे बालरोग शस्त्रक्रिया व लॅप्रोस्कोपी क्षेत्रातील अग्रगण्य शल्य चिकित्सक म्हणून ओळखले जातात. २४ नोव्हेंबर १९५१ रोजी मुंबईत जन्मलेल्या डॉ. ओक यांनी मिरज येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून शिक्षण घेतले. ते सेठ जी. एस. वैद्यकीय महाविद्यालयाचे माजी अधिष्ठाता, तसेच केईएम रुग्णालयाचे माजी अधिष्ठाता म्हणून कार्यरत राहिले. सध्या ते पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, मुंबईचे कुलपती आहेत. वैद्यकीय क्षेत्राबरोबरच साहित्य क्षेत्रातही त्यांचे मोठे योगदान आहे.

### संमेलनात सहभागी होण्याचे आवाहन

**मुख्यमंत्री सहायता निधीचे कक्षप्रमुख रामेश्वर नाईक, आरोग्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष उमेश चव्हाण, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराजराजे भोसले, आयएमए महाराष्ट्रचे माजी अध्यक्ष डॉ. अविनाश भोंडवे, माजी सहाय्यक पोलीस आयुक्त भानुप्रताप बर्गे आणि मिलिंद गायकवाड तसेच मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, पुणे जिल्ह्याचे मुख्य समन्वयक राजेंद्र कदम यांनी या संमेलनास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.**